

मनसे-शिवसेना युतीनंतर उमेदवार निश्चितीला वेग (पान ५ वर)

दैनिक **दिव्य वतन** जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक



राहुल म्हणाले- मोदी वन मॅन शो चालवत आहेत (पान ५ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ | E-mail : divyawatan@gmail.com | रविवार दिनांक २८ डिसेंबर २०२५ | अंक : १४४ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८


## महत्त्वाचे...

### नागपुरात शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सूरज गोजे यांच्यावर गुन्हा दाखल



नागपूर : तब्बल १११ ग्रॅम दागिने हडपून जातीवाचक शिवगीळ करून महिलेला धमकी दिल्याच्या आरोप प्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख सूरज मोहन गोजे (वय ४२) आणि त्यांचे वडील मोहन श्यामराव गोजे (वय ६५) या दोघांविरूद्ध फसवणुकीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. गोजे यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल झाल्याने राजकीय क्षेत्रात प्रचंड खळबळ उडाली आहे. ४४ वर्षीय महिलेच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, महिला हुडकेश्वर पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहते. म्हाळगीनगर येथे सूरज गोजे कुटुंबासह राहतात. २०२०मध्ये महिलेला मुलाच्या शिक्षणासाठी तीन लाख रुपयांची गरज होती. गोजे ओळखीचे असल्याने महिलेने त्यांच्याकडे पैशाची मागणी केली. दरम्यान महिलेने १११.५ ग्रॅम दागिने गोजे यांच्याकडे गहाण ठेवले. मोहन गोजे यांनी महिलेला दोन लाख ४० हजार रुपये रोख व उर्वरित ६० हजार रुपये ऑनलाइन दिले.

### आता हात लावला तर जशास तसे उत्तर देवू!




मिरा-भाईंदर: भाषेच्या नावाकरून मारवाडी बांधवाला मारले गेले. महाराष्ट्रात मराठी बोला, म्हणतात. आम्ही मराठीचा आणि महाराष्ट्राचा आदर करतो. हा महाराष्ट्र छत्रपती शिवाजी महाराजांचा आहे. कोणाच्या एकाच्या बापाचा नाही. त्यामुळे यापुढे जर मारवाडी बांधवाला हात लावला तर जशास तसे उत्तर देऊ, असा इशारा जैन मुनी निलेशचंद्र महाराज यांनी मिरा-भाईंदर मध्ये अमराठी व्यापाऱ्याला मराठी न बोलल्याने मधल्या काळात मारहण करण्यात आल्याच्या मुद्दवरून दिला आहे.मिरा-भाईंदर मध्ये सनातन धर्मसभा नावाने प्रवचन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना शिंदे गटाकडून सामाजिक संस्थेच्या आडून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याचे म्हटले जात आहे. या कार्यक्रमाला शनिवारी निलेशचंद्र महाराज यांनी हजेरी लावली होती. यावेळी पुढे बोलताना ज्या मारवाडी बांधवाला ज्यांच्याकडून मारहाण झाली त्यालाच नंतर तो जाऊन बुके देतो. ना त्याचा आमदार आहे, ना त्याचा खासदार आणि नगरसेवक.

### गुहागरच्या वीकेंड ट्रिपवर अप्रित घडलं..

रत्नागिरी: समुद्रकिनारी पोहताना काळजी न घेतल्यास थेट जीवावरती बेतू शकते अशा काही घटना कोकणात यापूर्वी समुद्रकिनारी घडल्या आहेत. ख्रिसमस आणि न्यू इयरच्या निमित्ता सध्या कोकणात पर्यटक मोठ्या संख्येने दाखल झाले आहेत. अशीच एक दुर्दैवी घटना रत्नागिरी जिल्ह्यात गुहागर समुद्रकिनारी घडली आहे. गुहागर समुद्रकिनारी पोहायला गेलेल्या अमुल विजयकुमार मुत्था (जैन) (वय 42, रा. पवई, मुंबई, व्यवसाय -सॉप्टवेअर इंजिनियर) यांचा समुद्रात बुडाल्याने दुर्दैवीरीत्या मृत्यू झाला आहे.गुहागर समुद्र किनाऱ्यावर तीन पर्यटक पोहोण्यासाठी उतरले होते. मात्र यावेळी हे तीन पर्यटक समुद्रातील आलेल्या मोठ्या लाटेबरोबर ओढले गेले. हे तिघंजण बुडू लागले. त्यांनी आरडाओरडा केल्याने स्थानिकांच्या लक्षात आलं की काही जण बुडत आहेत. स्थानिकांनी तात्काळ प्रसंगावधान राखत या तीनही पर्यटकांना बाहेर काढायला सुरूवात केली.

# मुंबईत भाजप-शिवसेनेचा जागावाटपाचा फॉर्म्युला जवळपास ठरला, २०७ जागांवर एकमत

**दिव्य वतन /वृत्तसेवा**



मुंबई : मुंबई महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सुरु असलेल्या घडामोडींकडे संपूर्ण महाराष्ट्राचं लक्ष लागलं आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महायुतीपासून वेगळा आहे. महायुतीत भाजप आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना हे एकत्र निवडणूक लढवणार आहेत. या निवडणुकीसाठी भाजप आणि शिवसेनेत जागा वाटपाचा फॉर्म्युला ठरत आहे. दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये जागावाटपाबाबत सातत्याने बैठका होताना दिसत आहेत. आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार, महायुतीत जागावाटपाबाबत जवळपास बऱ्याच जागांवर दोन्ही पक्षांचं एकमत झालेलं आहे. केवळ 20 जागांवर आता पेच असल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईत आतापर्यंत भाजप आणि शिंदे गटात 207 जागांवर एकमत झालं आहे. पण तरीदेखील 20 जागांवर पेच कायम आहे. आतापर्यंत ठरलेल्या जागावाटपानुसार भाजपच्या वाटेला निवडणूक लढण्यासाठी 128 जागा आणि शिवसेना शिंदे गटाला 79 जागा देण्याबाबत एकमत झाल्याची माहिती आहे. दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी महायुतीच्या बैठकांनंतर याबाबत महत्त्वाची माहिती देखील दिली आहे.

भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी याबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. "भाजप 128 जागा आणि शिवसेना 79 जागा अशा एकंदरीत 207 जागांवर आमचं एकमत झालेलं आहे. उर्वरित 20 जागांची चर्चा ही सुरु आहे. वरिष्ठ पातळीवर चर्चा होऊन लवकरच उरलेल्या 20 जागांचा तोडगाही काढण्यात येईल", अशी माहिती भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी दिली.

शिवसेनेचे माजी खासदार राहुल शेवाळे यांनी याबाबत महत्त्वाची प्रतिक्रिया दिली आहे. "भाजप 128 आणि शिवसेना 79 अशा जागांवर आमची सहमती झाली आहे. तर उरलेल्या 20 जागांवर आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे निर्णय घेतील", अशी माहिती राहुल शेवाळे यांनी दिली.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची आता युती झाली आहे. दोन्ही नेत्यांनी एकत्र येत पत्रकार परिषद घेत युतीची घोषणा केली. पण अजूनही दोन्ही नेत्यांकडून जागावाटपाचा फॉर्म्युला ठरलेला नाही. दोन्ही नेत्यांसोबत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षदेखील एकत्र निवडणूक लढवू शकतो अशी शक्यता आहे. पण जागावाटपावर जाहीर झाल्यानंतरच याबाबत उलगडा होण्याची शक्यता आहे. येत्या दोन दिवसांत याबाबत मोठा खुलासा होण्याची शक्यता आहे.

## श्रीरामाच्या तपोवनात राक्षसच झाडे तोडू शकतात

### आदित्य ठाकरे यांचा भाजपवर घणाघात; भाजप म्हणजे बिल्डर जनता पार्टी असल्याची टीका

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

पुणे -शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी नाशिक स्थित तपोवनातील वृक्षतोडीवरून सत्ताधारी भाजपवर सडकून टीका केली. प्रभू श्रीरामांच्या पंचवटीत झाडे तोडण्याचे काम राक्षसच करू शकतात. हे लोक साधुग्रामच्या नावाखाली जागा बिल्डरांच्या घशात घालण्याच्या प्रयत्नांत आहेत, असे ते म्हणाले.

आदित्य ठाकरे यांनी नाशिकच्या तपोवनाला भेट दिली. यावेळी त्यांनी आंदोलकांशी संवाद



साधून वृक्षतोडीला जोरदार विरोध केला. ते म्हणाले, प्रभू श्रीरामांच्या पंचवटीत झाडे तोडम्याचे काम राक्षसच करू शकतात. या लोकांचा साधूग्रामच्या नावाखाली तपोवनाची जागा बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव आहे. भाजपचे हिंदुत्त्व चुनावी आहे. भाजप देशात रामराज्य नव्हे तर रावण राज्य आणण्याच्या प्रयत्नांत आहे. भाजप म्हणजे बिल्डर जनता पार्टी आहे. भाजप आमदार होता म्हणून बलात्कार करूनही एका आमदाराला जामीन मिळाली. ज्याला फाशीवर चढवायला हवे, त्याला बेल मिळाली.

भाजपने साधू हत्याकांडातील आरोपीला का प्रवेश दिला?

बिलकिस बानोच्या कुटुंबाला तिच्या डोळ्यापुढे मारून टाकले. लाडकी बहीणवर बोललो म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चिडले होते. पण ते राज्यातील वाढती गुन्हेगारी व बेरोजगारीवर काहीही बोलत नाही.

## भाजपची उमेदवारी निश्चित नसतानाही कृष्णराज महाडिकांचा अर्ज स्वत:च्या ताकदीवर लढणार; कोल्हापुरात राजकीय हालचाल

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

कोल्हापूर- महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर कृष्णराज महाडिक यांनी आपल्या राजकीय वाटचालीचा अधिकृत प्रारंभ झाल्याची भावना व्यक्त केली आहे. भाजपकडून अद्याप अधिकृत उमेदवार यादी जाहीर झालेली नसतानाही त्यांनी पुढाकार घेत अर्ज दाखल केला असून, हा निर्णय आपल्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असल्याचं त्यांनी सांगितलं. कुटुंबीयांचा आशीर्वाद, मित्रांचा विश्वास आणि समर्थकांचं पाठबळ घेऊन आपण निवडणुकीच्या मैदानात उतरलो असल्याचं महाडिक यांनी स्पष्ट केलं. आजचा दिवस हा केवळ निवडणूक प्रक्रियेचा भाग नसून, आपल्या सार्वजनिक जीवनाच्या प्रवासाचा प्रारंभ असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

ही निवडणूक आपण स्वतःच्या ताकदीवर आणि जनतेच्या विश्वासावर लढवत असल्याचं सांगतानाच, खासदार धनंजय महाडिक यांचा आशीर्वाद आणि



मार्गदर्शन कायम सोबत असल्याचं त्यांनी अधोरेखित केलं. सध्या खासदार धनंजय महाडिक यांच्यावर राज्यातील आणि विविध जिल्ह्यांतील जबाबदाऱ्या असल्यामुळे ते किती वेळ थेट प्रचारासाठी देऊ शकतील, याबाबत अनिश्चितता असली तरी त्यांचे मार्गदर्शन आपल्यासाठी महत्त्वाचं असल्याचं त्यांनी नमूद केलं. कुटुंबीय, मित्रपरिवार आणि कार्यकर्त्यांच्या साथीनं आपण ही निवडणूक सक्षमपणे लढवू, असा विश्वास कृष्णराज महाडिक यांनी व्यक्त केला. आतापर्यंत सामाजिक कामांच्या माध्यमातून विविध सामाजिक प्रश्न, नागरिकांच्या अडचणी आणि स्थानिक विषयांवर सक्रिय राहिल्याचा अनुभव आपल्याला उपयोगी पडेल, असंही त्यांनी सांगितलं.

## हातात बेड्या, तोंडावर काळं कापड अन् गळ्यात दोरखंड

### गुंड बंडू आंदेकरचा निवडणूक अर्ज दाखल, भवानी पेठ कार्यालयात घोषणाबाजी

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

पुणे -विद्येचे माहेरघर आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असलेल्या पुणे शहरात आज उत्तर प्रदेश आणि बिहारमधील राजकारणाची आठवण करून देणारे धक्कादायक चित्र पाहायला मिळाले. कुख्यात 'आंदेकर टोळी'चा म्होरक्या आणि हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी गुंड बंडू आंदेकर याने आज पोलिसांच्या कडक बंदोबस्तात, हातात बेड्या आणि गळ्यात दोरखंड असलेल्या स्थितीत महापालिका निवडणुकीसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. विशेष न्यायालयाने दिलेल्या सशर्त परवानगीनंतर आंदेकर कुटुंबातील तिघांनी तुरुंगातून बाहेर येत



निवडणुकीच्या मैदानात उडी घेतली आहे.

आयुष कोमकर हत्या प्रकरणात सध्या येरवडा कारागृहात असलेला बंडू आंदेकर आज दुपारी भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात दाखल झाला. पोलिसांनी त्याला दोरखंडाने जखडलेले होते आणि सुरक्षेच्या कारणास्तव त्याच्या चेहऱ्याला काळे कापड बांधले होते. मात्र, अर्ज भरण्यासाठी कार्यालयात जाताच आंदेकरने 'व्हिक्ट्री साईन' दाखवत घोषणाबाजी सुरू केली. "नेकी का काम, आंदेकर का नाम," अशा घोषणा देत त्याने परिसर दणाणून सोडला. "बघा, मला लोकशाहीत कसं आणलंय. मी उमेदवार आहे, दरोडेखोर नाही. आंदेकरांना मत म्हणजे विकासाला मत," असे ओरडून तो उपस्थितांचे लक्ष वेधून घेत होता.

केवळ बंडू आंदेकरच नव्हे, तर त्याच्या कुटुंबातील आणखी दोन महिलांनीही तुरुंगातूनच अर्ज भरले आहेत. सोनाली आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर हेदेखील 5 कोटी 40 लाखांच्या खंडणी प्रकरणात जेलमध्ये आहेत. या दोघींनीही उमेदवारी अर्ज भरला आहे. बंडू आंदेकर हा प्रभाग क्रमांक 24 मधून अपक्ष किंवा राष्ट्रवादीकडून लढण्याची शक्यता आहे.

विशेष न्यायालयाने या तिघांनाही आगामी महापालिका निवडणुकीत उमदेवारी अर्ज भरण्यास परवानगी दिली. मात्र बंडू आंदेकरला उमेदवारी अर्ज दाखल करताना मिरवणूक, भाषण, घोषणाबाजी करायला कोर्टाने मनाई केली.

## पुण्यात राष्ट्रवादीची युती तुटली:१६५ जागांसाठी महाविकासचा फॉर्म्युला, पण वंचितच्या मागणीने पेच

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

पुणे - पुण्यात नुकत्याच पार पडलेल्या महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीत आगामी पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी जागावाटपाचं प्राथमिक सूत्र ठरवण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती समोर आली आहे. पुणे महापालिकेत एकूण 165 जागा असून, त्यापैकी काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट यांनी प्रत्येकी 50 जागांवर निवडणूक लढवण्यावर तिन्ही पक्षांमध्ये प्राथमिक एकमत झालं आहे. उरलेल्या 15 जागा या वंचित बहुजन आघाडी आणि आम आदमी पक्षासाठी खुल्या ठेवण्याची तयारी या तिन्ही पक्षांनी दर्शवली आहे. महाविकास आघाडी अधिक व्यापक करण्यासाठी वंचित आणि



आपचा समावेश करून घेण्याचे प्रयत्न सुरू असल्याचंही या बैठकीत स्पष्ट करण्यात आलं.

महाविकास आघाडीत नव्या पक्षांना सामावून घेण्याचा प्रयत्न असला, तरी वंचित बहुजन आघाडीने थेट 28 जागांची मागणी केल्यामुळे ही चर्चा सध्या अडचणीत सापडली आहे. वंचितची ही मागणी आघाडीतील तिन्ही प्रमुख पक्षांना मान्य होईल का, याबाबत अद्याप स्पष्टता नाही. त्यामुळे वंचित महाविकास आघाडीत सहभागी होणार की नाही, यावर सध्या प्रश्नचिन्ह आहे. दुसरीकडे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेबाबतही महत्त्वाचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. मनसेला स्वतंत्र कोटा न देता, शिवसेना उद्धव ठाकरे गटाने आपल्या वाट्यातून काही जागा देण्याचा निर्णय झाल्याची माहिती आहे. यामुळे पुण्यातील राजकीय समीकरणे अधिक गुंतागुंतीची बनत चालली आहेत.दरम्यान, पुणे महापालिकेत एकत्र निवडणूक लढवण्याबाबत सुरू असलेली दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांची चर्चा अखेर फिस्कटल्याचं स्पष्ट झालं आहे. शुक्रवारी झालेल्या चर्चांमध्ये अजित पवार गटाने शरद पवारांच्या राष्ट्रवादीला केवळ 30 ते 35 जागा देऊ केल्याची आणि घड्याळ या निवडणूक चिन्हावरच निवडणूक लढण्याची अट घातल्याची माहिती समोर आली.

## अकोल्यात दादांच्या NCP ची १०-१५ जागांवर बोळवण

### मान सन्मान नको, पण अपमान कसा सहन करायचा? मिटकरींचा भाजपवर संताप

**दिव्य वतन /वृत्तसेवा**

अकोला महापालिकेच्या निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसला अवघ्या 10-15 जागा मिळण्याची शक्यता आहे. यामुळे राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी भाजप व शिवसेनेवर संताप व्यक्त करत 'तुमचा मान, सन्मान नकाच देऊ, पण अपमानही कसा सहन करायचा?' असा उद्विग्न सवाल केला आहे.

सत्ताधारी महायुतीने म्हणजे भाजप, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाने विदर्भातील चारही महापालिका मिळून लढवण्याचा निर्णय घेतला आहे. पण अकोला महापालिका निवडणुकीवरून महायुतीत वादंग होण्याची शक्यता वाढली आहे. 2017 च्या निवडणुकीत अकोला महापालिकेच्या 80 पैकी सर्वाधिक 48 जागा भाजपच्या ताब्यात होत्या. तर शिवसेना व राष्ट्रवादीला अनुक्रमे 8 व 5 जागांवर समाधान मानावे लागले होते. त्यामुळे यंदा तिन्ही पक्षांच्या ताब्यात असलेल्या 61 जागा सोडून इतर 19 जागांचे तिन्ही पक्षांत वाटप करण्याचा निर्णय झाला आहे.

त्यात शिंदे गटाला 7-8, तर अजित पवारांच्या राष्ट्रवादीला 5-6 जागा मिळण्याची शक्यता आहे. त्यानुसार, एकूण जागावाटपात भाजपला 55, शिंदे गट 15 व राष्ट्रवादी 10 असे असण्याची शक्यता आहे.

पण आता आमदार अमोल मिटकरी यांनी या जागावाटपावरून शिंदे गट व भाजपवर जोरदार हल्ला चढवला आहे.

अमोल मिटकरी या प्रकरणी आपला संताप व्यक्त करताना म्हणाले, तुमचा मान, सन्मान नकाच देऊ..परंतू अपमानही सहन कसा करायचा? 10 - 15 जागांवर बोळवण करून राष्ट्रवादी पक्षाला ग्राह्य धरत नसाल, तर अकोल्यात 'मैत्रीपूर्ण' ताकद दाखवत प्रेमाने लढावे लागेल. पक्षातील जिल्ह्यातील नेत्यांच माहीत नाही, पण तळागाळातील सामान्य कार्यकर्ता अजून जिवंत आहे. माझा पक्ष, माझा स्वाभिमान. मिटकरींच्या या भूमिकेमुळे महायुतीत वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे भाजप व शिंदे गटात सध्या प्रभाग क्रमांक 17 वर चर्चा सुरू आहे. या प्रभागावर दोन्ही पक्षांनी दावा केला आहे. या प्रभागात ठाकरे गटातून शिंदे गटात आलेल्या राजेश मिश्रा यांनी तयारी केली आहे. त्यामुळे ते हा प्रभाग सोडण्यास तयार नाहीत. त्यांनी 2024 च्या विधानसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवारी दाखल करत 2500 मते घेतली होती.

यामुळे भाजप उमेदवार भाजप उमेदवाराचा पराभव झाला होता. त्यामुळे भाजप कोणत्याही स्थितीत या वॉर्डात राजेश मिश्रा यांच्यासोबत हातमिळवणी करण्याच्या मूडमध्ये नाही. यामुळे शिंदे गट व भाजपत वादावादी सुरू आहे.



## अकोला वृत्त

### बाष्पयुक्त हवेने कमाल व किमान पाऱ्यात फरक तर आठवडाभर रात्रीचे तापमान कमी



अकोला जिल्ह्यात गत तीन दिवसांपासून कमाल व किमान तापमानातील फरक कमी होत चालला आहे. ढगाळ वातावरण, वाऱ्याच्या दिशेत झालेला बदल आणि हवामानातील बदलामुळे किमान तापमान वाढत चालले आहे. तसेच कमाल तापमानही ३०.२ अंशांवर पोहोचले आहे. अकोल्याचे शुक्रवारचे (दि.२६) कमाल तापमान ३०.२ अंश राहिले तर कमाल तापमान १२.३ अंशांपर्यंत वाढले आहे.दरम्यान, ढगाळ व बाष्पयुक्त हवामानामुळे रात्रीची थंडी कमी होते. यामुळे दिवसाचे तापमान आणि रात्रीच्या तापमानात अधिक तफावत जाणवत आहे, असे हवामानतज्ञ सुरेश चोपने यांनी सांगितले. तसेच जागतिक हवामानातील बदलामुळे तापमानात चढ- उतार होतात.त्याचा परिणाम हिवाळ्यात थंडी कमी होण्यात होतो, असे तज्ञांनी सांगितले. दरम्यान, वातावरणातील हा बदल आठवडाभर कायम राहणार आहे. त्यामुळे आगामी काही दिवस कमाल व किमान वातावरणातील फरक कमी राहणार आहे, असे हवामान तज्ञांनी सांगितले.

### जगाला तारण, शांती, प्रेम, आनंद देण्यासाठी देवाने येशूंना पाठवले

प्रभू येशू ख्रिस्तांनी दिलेली प्रेम, बंधुभाव आणि त्यागाची शिकवण आचरणात आणा. तसेच समाजात वावरताना सत्य, खरेपणाचा अवलंब करा, जगाला तारण, शांती, प्रेम, आनंद देण्यासाठी देवाने प्रभू येशू यांना भूतलावर पाठवले, असे प्रतिपादन रेव्हरंड निलेश अघमकर यांनी केले. ते प्रभू येशू ख्रिस्तांच्या जन्मदिवसानिमित्त खदान खिश्चन कॉलनी येथील बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्च येथे आयोजित प्रार्थना सभेमध्ये बोलत होते.

गुरुवार, २५ डिसेंबर रोजी ख्रिसमस अर्थात नाताळ हा सण जगभरात साजरा केला जातो.

अकोला महानगर आणि जिल्ह्यातही येशू खिस्तांचा जन्मदिवस अर्थात नाताळ हा सण मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला. या वेळी खिश्चन बंधू - भगिनींनी एकमेकांना विविध भेटवस्तू, शुभेच्छापत्रे देऊन परस्परांचे अभिनंदन केले. ख्रिसमसनिमित्त सुमारे १६० वर्षांचा इतिहास असणारी अकोल्यातील एकमेव खिश्चन कॉलनी घरांना करण्यात आलेल्या रंगरंगोटी, रोषणाईने झगमगून, उजळून निघाली आहे. खिश्चन धर्मियांच्या धार्मिकस्थळांची म्हणजेच चर्चची देखील सजावट आणि रोषणाई करण्यात आली आहे. विविध ठिकाणी खिसमस ट्री आणून त्यांच्यावर रोषणाई करण्यात आली आहे. अनेक चर्चेसमध्ये येशूच्या जन्माचे देखावे सादर करण्यात आले आहेत.

### अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी गेलेला एक जण जागीच ठार

अकोला : २४ डिसेंबरच्या रात्री ख्रिश्चन अबालवृद्धांनी विविध चर्चेसद्वारे आयोजित कॅरल पार्टीमध्ये सहभागी होऊन रात्रभर घरोघरी भेटी देऊन खिस्तजन्माची गीते गायिली. एकमेकांना खिस्तजयंतीच्या शुभेच्छा दिल्या. सांताक्लॉजच्या वेषातील युवक - युवती यावेळी सर्वांच्याच आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरले.प्रार्थनेतून ख्रिसमसचा संदेश गुरुवार, २५ डिसेंबर रोजी सकाळी सर्वच चर्चेसमधून प्रार्थनासभांचे आयोजन करण्यात आले होते. ख्रिश्चन कॉलनी येथील बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्चमध्ये रेव्हरंड निलेश अघमकर यांनी ख्रिसमसचा संदेश दिला. इतरही चर्चेसमधून धर्मगुरुंनी ख्रिस्तजन्मावर आधारित संदेश दिले. संघर्ष, अराजकतेची परिस्थिती पाहता जगाला प्रभू येशूने दिलेल्या शांती, प्रेम, बंधुभाव, त्याग, शिकवण आचरणात आणावी.

# एकनाथ शिंदेंच्या मागे राहू, शनिदोष - विजय वडेट्टीवार

## दिला ज्योतिष्याला भेटण्याचा सल्ला, भाजपच्या ठाण्यातील प्रचारावरुन मारली कोपरखळी

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

नागपूर भाजपने एकनाथ शिंदेंचा बालेकिल्ला असणाऱ्या ठाण्यात आक्रमक प्रचार सुरू केला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी या प्रकरणी एकनाथ शिंदे यांचा चिमटा काढला. एकनाथ शिंदे यांच्या मागे सध्या राहू किंवा शनिदोष आहे का? याची खात्री त्यांनी एखाद्या ज्योतिषाकडे जाऊन करून घेतली पाहिजे. राहू, केतू आदी ग्रह त्यांना शांतपणे जगू देतील का? अशी शंका या प्रकरणी येत आहे, असे ते म्हणालेत.विजय वडेट्टीवार यांनी आज नागपुरात पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी मुंबईतील वंचित बहुजन आघाडीसोबतच्या आघाडीच्या चर्चेसह विविध मुद्यांवर प्रकाश टाकला.वंचित बहुजन आघाडीने मुंबईत काँग्रेसला 60 जागा मागितल्याची माहिती आहे. यावर वडेट्टीवार म्हणाले, वंचित बहुजन आघाडीने कोणत्या जागांवर दावा केला आहे हे मला माहिती नाही. मी त्या प्रक्रियेत नाही. आमच्या मुंबईतील नेत्यांशी चर्चा झाल्यानंतर मी हे सांगू शकेन. पण आज सायंकाळी किंवा रात्री उशिरा चर्चा पूर्ण होईल. उमेदवारी दाखल करण्यास आणखी 2 दिवसांचा अवधी शिल्लक आहे. त्यात दोन पाऊल मागे - पुढे करून कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला पाहिजे.सध्या दोन्ही राष्ट्रवादीची एकत्र निवडणूक लढवण्याची चर्चा सुरू आहे. पण शरद पवार गटाचे प्रवक्ते अंकुश काकडे यांनी ही चर्चा फिस्कटल्याचा दावा केला आहे. यावर बोलताना वडेट्टीवार म्हणाले, दुसऱ्याच्या घरात काय चालले आहे ते डोकावून पाहण्याचा अधिकार मला नाही. पण त्यांच्या चर्चा पुढे खूप गेल्याचे मी ऐकले आहे. त्यांच्यात घड्याळावर लढा व तुतारीवर लढा असा विषय सुरू आहे. मला ज्यावेळी यासंदर्भात त्यांच्या बैठका झाला, त्याचवेळी आम्ही निर्णय घेतला की, शरद पवार अजित पवारांसोबत जात असतील तर आपण स्वतंत्रपणे निवडणूक लढवायची असे आम्ही यापूर्वीच स्पष्ट केले आहे.

त्यामुळे त्यांनी काय करायचे, त्यांच्याकडे कसे बघायचे हे आमचा अधिकार नाही. त्यांचे कार्यकर्त्यांकडे हा अधिकार आहे. जनता हा सगळा धिंगाणा पाहत आहे. कुणाचा पायपोस कुणाशी नाही. वाटेल त्या पद्धतीच्या आघाड्या व युत्या होत आहेत. राजकारणाचा चिखल झाला आहे. त्या चिखलात सर्वांच्या अंगावर डाग पडत आहेत. कितीही धुतले तरी हे डाग साफ होतील असे दिसत नाही. एवढ्या खालच्या पातळीवरचे राजकारण व गोंधळलेली परिस्थितीत महाराष्ट्रात पहिल्यांदाच निर्माण झाली आहे. यापूर्वी केव्हाही अशी परिस्थिती निर्माण झाली नाही.

भाजपने ठाण्यात नमो भारत, नमो ठाणे असा प्रचार सुरू केला आहे. पत्रकारांनी याविषयी वडेट्टीवारांना छेडले असता त्यांनी एकनाथ शिंदे यांना आपली पत्रिका एखाद्या ज्योतिषाकडे दाखवण्याचा सल्ला दिला. मी यावर काय बोलू. कुणी नमो म्हणो, कुणी सुमो म्हणो, कुणी रमो म्हणो. हा त्यांचा प्रश्न आहे. पण एक आहे की, सध्या एकनाथ शिंदेंच्या मागे राहू दोष किंवा शनी दोष आहे का? याची खात्री त्यांनी एखाद्या ज्योतिषाकडे जाऊन करून घेतली पाहिजे. राहू, केतू आदी ग्रह त्यांना शांतपणे जगू देतील का, त्यांच्या मागे काही अडचणी आहेत का अशी शंका या प्रकरणी येत आहे, असे ते म्हणाले.



विजय वडेट्टीवार यांनी यावेळी मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांना बोलावण्याच्या मुद्यावरूनही भाजप व महायुती सरकारवर निशाणा साधला. ते म्हणाले, स्थानिक पातळीवरच्या निवडणुकांत योगींची गरज वाटत असेल, तर हे भाजपचे अपयश आहे. राज्यातील तिन्ही सत्ताधारी पक्ष जनतेच्या परीक्षेत नापास झालेत. त्यामुळे भाजपवर दुसऱ्या राज्याच्या मुख्यमंत्र्याला बोलावून पास होण्यासाठी मदत घेण्याची वेळ आली आहे. योगींची गरज वाटते म्हणजेच आपल्या हेडमास्तरला वर्ग सांभाळता येत नाही. त्यामुळे प्रिन्सिपलला आणून हा महाराष्ट्र पुन्हा सांभाळायचा अशी परिस्थिती दिसत आहे.

निवडणुकीत ध्रुवीकरण करण्याची भाजपची जुनी परंपरा आहे. ध्रुवीकरण केल्याशिवाय राजकारण करताच येत नाही. त्यांना यशही मिळत नाही. ते मते मिळवण्यासाठी प्रांतवाद आणतील, पण बोट दुसऱ्याकडे दाखवतील. धर्मवाद आणतील, पण बोट दुसऱ्याकडे दाखवतील. या सगळ्या गोष्टी ते आणतील. सगळ्या प्रकारचे फंडे करून निवडणूक कोणत्याही परिस्थिती जिंकायची हा त्यांचा प्रयत्न आहे. सगळ्या गोष्टी करून यश दिसत नसेल, तर शेवटी निवडणूक आयोग त्यांच्या मदतीला आहे, असे ते म्हणाले.

## पत्नीची बंगळुरूत, पतीची नागपुरात आत्महत्या

### दोन महिन्यांपूर्वीच झाले होते लग्न, सासू थोडक्यात वाचली

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

नागपूर येथील वर्धा रोड स्थित हॉटेल रोयाल वीलामध्ये आई आणि मुलाने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. घटनेत मुलाचा मृत्यू झाला तर आई गंभीर आहे. आईचे नाव जयंती तर मुलाचे नाव सुरज आहे. दोघेही बंगळुरू येथील रहिवासी आहे. सुरजचे २६ वर्षीय गानवी उर्फ राशीसोबत २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी लग्न झाले होते. सुरज बेंगुळुरू येथील बेल लेआऊट, विद्यारण्यपुरा येथे राहात होता. तर गानवी राममूर्ती पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बी. चन्नासंद्रा येथे राहात होती.



सुरजची पत्नी गानवी हीने बंगळुरूमध्ये बुधवार २४ च्या रात्री तिच्या आई वडीलांच्या घरी गळफास घेतला. घरच्यांनी तिला तत्काळ खासगी रूग्णालयात दाखल केले. तिथे शर्थीचे प्रयत्न करूनही तिचा गुरूवारी मृत्यू झाला. ४० लाख रूपयांच्या हुंड्यासाठी तिचा छळ होत असल्याचा आरोप करत मृत तरुणीच्या नातेवाईकांनी बंगळुरू येथील स्थानिक पोलीस स्टेशनसमोर आंदोलन केले होते. दरम्यान गानवीच्या मृत्यू नंतर बंगळुरूमध्ये आंदोलन सुरु असतांना आई आणि मुलगा नागपुरात दाखल झाले होते. दोघांनीही स्थानिक हॉटेल रोयाल वीलामध्ये मुक्काम केला होता. याच हाटेलमध्ये दोघांनीही आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला.२६ वर्षीय गणवी उर्फ राशीने २९ ऑक्टोबर, २०२५ रोजी एका खाजगी कंपनीत काम करणाऱ्या सूरजशी लग्न केले. तिच्या कुटुंबीयांनी आरोप केला आहे की, लग्नानंतर लगेचच सूरज आणि त्याच्या कुटुंबीयांनी हुंड्यासाठी तिचा छळ करण्यास सुरुवात केली. लग्नाच्या स्वागत समारंभासाठी ४० लाख रुपयांची मागणी करीत तिचा छळ केला. मिळालेल्या माहितीनुसार, श्रीलंकेतील त्यांच्या हनिमूनदरम्यानही हा छळ सुरूच होता. त्यामुळे गणवीने हनिमून अर्धवट सोडून आपल्या माहेरी परत आली. तिथे ती नंतर गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळली.

## राज्यस्तरीय उपवर युवक–युवती परिचय मेळावा व पुस्तिका प्रकाशनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दिव्य वतन/ प्रतिनिधी**




नागपूर : महात्मा फुले शिक्षण संस्था, रेशीमबाग (नागपूर) येथे गुरुवारी सर्व शाखीय माळी समाजाचा राज्यस्तरीय उपवर युवक–युवती परिचय मेळावा व 'योगायोग' परिचय पुस्तिकेचे प्रकाशन उत्साहात पार पडले. समाजबांधवांचा व युवक–युवतींचा या मेळाव्यास मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या शुभहस्ते क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्यांना माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या परिचय मेळाव्यात एकूण १४५९ उपवर युवक व युवतींची नोंद घेण्यात आली असून त्यांचा तपशील 'योगायोग' या परिचय पुस्तिकेत समाविष्ट करून तिचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष प्रा. अरुण पवार यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून शरदराव निंबाळकर (माजी कुलगुरू, पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला) उपस्थित होते. तसेच अशोकराव मानकर (माजी आमदार, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी 'योगायोग' पुस्तिकेसाठी गावखेड्यांतून नोंदणी करून योगदान देणाऱ्या प्रतिनिधींचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची प्रस्तावना उपवर वधू–वर परिचय मेळावा समितीचे संयोजक व संस्थेचे संचालक सुनील चिमोटे यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती मायाताई जोगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सह-संयोजक शरद चांदोरे यांनी मानले. या प्रसंगी 'योगायोग' परिचय मेळाव्यात सहभागी युवक–युवतींनी स्टेजवरून आपला परिचय करून दिला. कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष प्रकाशजी देवते, उपाध्यक्ष गुलाबराव चिचाटे, सरचिटणीस रविंद्र अंबाडकर, सहचिटणीस रमेशजी राऊत, कोषाध्यक्ष प्रा. मुकेश घोळसे, सह-संयोजक शरद चांदोरे, अजय गाडगे, धनराज फरकाडे, राजू गाडगे तसेच संचालक राजेंद्र पाटील, मोहित श्रीखंडे, डॉ. प्रा. अभिजीत पोतले, नंदू कन्हेर, प्रा. पंकज कुरळकर, देवेंद्र काटे, डॉ. सौ. अलकाताई झाडे यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव व परिचय देण्यासाठी आलेले युवक–युवती उपस्थित होते.

## पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटिक) नागपूर महापालिका निवडणुकीत पूर्ण ताकदीनिशी मैदानात; २२ उमेदवारांची अधिकृत घोषणा

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

नागपूर : जानेवारी २०२६ मध्ये होऊ घातलेल्या नागपूर महानगरपालिका निवडणुकीसाठी पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रेटिक) – पीपीआयडीने जोरदार तयारी सुरू केली आहे. जरी हा पक्ष नव्याने राजकीय पटलावर आलेला असला, तरी तो गेल्या ५० वर्षांच्या फुले–आंबेडकरवादी आंदोलनाचा परिणाम असून सामाजिक न्यायाच्या विचारसरणीवर आधारित आहे. पीपीआयडी हा राष्ट्रीय स्तरावरील पक्ष असून नागपूर शहरातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत १० प्रभागांमध्ये एकूण ४० उमेदवार उतरवण्याची तयारी पक्षाने दर्शवली आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २२ उमेदवारांच्या नावांवर शिक्कामोर्तब करण्यात आले असून त्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या निवडणुकीत पक्षाला अनेक एससी, एसटी, ओबीसी व अल्पसंख्याक संघटनांचा पाठिंबा मिळत असून



त्यामध्ये आक्रमण युवक संघटना, मुलनिवासी विद्यार्थी संघ, ओबीसी युथ फ्रंट आणि आदिवासी युवक संघटना यांचा समावेश आहे, अशी माहिती नागपूर जिल्हा प्रभारी (इंचार्ज) ओपूल तामगाडगे आणि राज्याध्यक्ष (युथ विंग) राहुल मडामे यांनी दिली. यावेळी मुलनिवासी विद्यार्थी संघाचे प्रचारक ब्रिजेश खटाणा, आक्रमण युवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष विशाल बनसोड, आदिवासी युवक संघटनेचे अनिकेत कन्नाके आणि ओबीसी युथ फ्रंटचे निकेतन फुसे उपस्थित होते. जाहीर करण्यात आलेल्या उमेदवारांची यादी पुढीलप्रमाणे : प्रभाग ०२ – रोहन उके, अश्विनी मेश्राम, प्रियंका सोरदे प्रभाग ०५ – निलेश सरोदे प्रभाग ०६ – प्रवीण अडकने प्रभाग ०७ – सुमित कोटांगले, वैशाली चौरे, ग्रीष्मा नारनवरे (एससी) प्रभाग १३ – गौरव सोनुने, अभिजीत कोपरे (ओबीसी) प्रभाग १७ – ओपूल तामगाडगे, सोनाली पांडे, मुस्कान हिकरे (एससी), चेतन झलके प्रभाग २३ – तुषार मेश्राम (एससी), नसीम आलम प्रभाग ३२ – राणीबाई जामिनकर, सूरज पुराणिक प्रभाग ३३ – सचिन कुंभारे, शशांक वाघमारे प्रभाग ३५ – संदीप चव्हाण, अनिकेत कन्नाके पीपीआयडीने नागपूर महापालिका निवडणुकीत सामाजिक न्याय, समता व सर्वसमावेशक विकासाच्या मुद्द्यांवर निवडणूक लढवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.



## बनावट आयडी तयार करून शासनाची कोटींची फसवणूक

### शालार्थ आयडी घोटाळ्याचा २ जानेवारीला अहवाल

**दिव्य वतन /प्रतिनिधी**



नागपूर जिल्ह्यातील शालार्थ आयडी घोटाळ्यात अखेर अंतिम अहवालाचा मुहूर्त निघाला आहे. नवीन वर्षात शुक्रवार, २ जानेवारी २०२६ रोजी अंतिम अहवाल सादर होणार असल्याची माहिती शालार्थ आयडी घोटाळ्याची प्रशासकीय चौकशी करीत असलेले प्राथमिक व माध्यमिक विभाग संचालक महेश पालकर यांनी "दिव्य मराठी'ला दिली. नागपूर विभागात घोटाळ्यात प्रमुख १३ आरोपींनी तब्बल १,९७२ बनावट आयडी तयार करून १५० कोटींची फसवणूक केल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.महेश पालकर यांनी अंतरिम अहवाल जून २०२५ च्या शेवटी सादर केला होता. मात्र त्यानंतर मनुष्यबळाच्या कमतरतेचा बाऊ करीत वारंवार अहवाल सादर करण्यास विलंब होत गेला. आता मात्र सर्व फाईली तपासण्यात आल्या असून अंतिम अहवाल तयार झाला आहे. त्यावर संबंधित वरिष्ठांच्या सह्या झाल्यानंतर २ जानेवारी २०२६ रोजी अहवाल सादर केला जाईल असे पालकर यांनी सांगितले. गत सहा महिन्यांपासून पालकर यांच्याकडून अंतिम अहवाल सादर करण्यास होत असलेल्या विलंबामुळे घोटाळ्याची चौकशी थांबली आहे. नवीन वर्षात या चौकशीला गती येईल असे चित्र आहे."शालार्थ आयडी' घोटाळ्यामध्ये मोहपा येथी विठ्ठल रुख्मिणी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व भाजपचे माजी पंचायत समिती अध्यक्ष दिलीप धोटे यांना अटक झाल्यानंतर पाचावर धारण बसलेल्या शिक्षण संस्था चालकांच्या मदतीसाठी अदृश्य हात कार्यरत झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

# अज्ञात प्राणी आईच्या कुशीतील चिमुकलीला घेऊन पसार

## शरीराचे लचके तोडत छातीसह खाल्ले दोन्ही हात; नागपुरातील भयंकर घटना

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

नागपूर- एका अज्ञात प्राण्याने आईच्या कुशीत झोपलेल्या एका 6 महिन्यांच्या चिमुकलीला उचलून नेऊन तिला ठार मारल्याची भयंकर घटना नागपूरच्या नरसाळा भागात घडली आहे. या घटनेत प्राण्याने चिमुकलीच्या छातीसह दोन्ही हात खाल्लेत. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ माजली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, हुडकेश्वर पोलिस ठाणे हद्दीतील नरसाळा परिसरात ही मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. येथील स्मशानभूमी लगतच्या नाल्याच्या मागे असलेल्या मजुरांच्या झोपडपट्टीत अज्ञात प्राण्याच्या हल्ल्यात अवघ्या 6-7 महिन्यांच्या एका चिमुकलीचा मृत्यू झाला आहे. अनुष्का रवी मेळा असे मृत मुलीचे नाव आहे. ती मध्य प्रदेशातील सेलमिया गावची रहिवासी होती. ठेकेदाराच्या कामासाठी तिचे कुटुंब नागपुरात आले होते. ते सध्या नरसाळा परिसरातील झोपडपट्टीत वास्तव्यास होते.

अनुष्का शुक्रवारी रात्री आपल्या आईच्या कुशीत झोपली होती. मध्यरात्री केव्हातरी एका अज्ञात प्राण्याने तिला तेथून अलगद उचलून नेले. काही वेळाने मध्यरात्री 2 च्या सुमारास तिच्या आईला जाग आली असता त्यांना अनुष्का दिसली नाही. त्यामुळे त्यांनी व कुटुंबीयांनी तिचा शोधाशोध सुरू केला. रडारड सुरू केली. हा आवाज ऐकूण शेजारी गोळा झाले. त्या सर्वांनी अनुष्काचा शोध घेतला असता झोपडपट्टीलगतच तिचा छिन्नविच्छिन्न अवस्थेतील मृतदेह आढळून आला.

स्थानिकांच्या माहितीनुसार, अज्ञात प्राणाने अनुष्काच्या शरीराचे अक्षरशः लचके तोडले आहेत. तिची छाती व दोन्ही हात खाल्लेत. या परिसरात रात्रीच्या वेळी रस्त्यावर दिवे नाहीत. त्यामुळे अंधाराचा फायदा घेत ही घटना घडल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. पण हा हल्ला करणारा प्राणी नेमका कोणता होता? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. मात्र या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ माजली आहे.




विशेषतः रोजीरोटीसाठी बाहेर गावाहून आलेल्या मजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही यामुळे गंभीर बनला आहे. त्यामुळे प्रशासनाने या प्रकरणी योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी केली जात आहे. दरम्यान, हुडकेश्वर पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. वनविभागालाही या घटनेची माहिती देण्यात आली आहे.

## महत्त्वाचे...

### वीजपुरवठ्याच्या समस्येने शेतकऱ्यांवर रात्री जागण्याची वेळ



अकोला : खरीप हंगामात शेतकऱ्यांनी कापूस आणि सोयाबीन पिकावर जिवापाड मेहनत घेतली. मात्र, अतिवृष्टीमुळे त्यांच्या हातात काहीच आले नाही. खरिपात झालेला तोटा भरून काढण्यासाठी शेतकरी रब्बी हंगामाच्या तयारीला लागले आहेत. यंदा अतिवृष्टीमुळे परिसरातील विहिरींमध्ये मुबलक पाणीसाठा आहे. तरीही विजेअभावी सिंचनासाठी धडपड करावी लागत आहे. दरम्यान, शासनाने दिवसा वीज देण्याचे आश्वासन दिले. मात्र, अद्यापही रात्री पाणी देण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.शेतकऱ्यांची आर्थिक मदार खरीप हंगामावर अवलंबून असते. गेल्या काही वर्षांपासून एकही हंगाम शेतकऱ्यांना साथ देत नाही. परिणामी, कर्जाचा डोंगर कमी होण्याऐवजी वाढत चालला आहे. निराशा झटकून शेतकरी प्रत्येक हंगामात मेहनत करून उत्पन्न काढण्यावर भर देत आहेत. यंदा अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. त्यातून वाचलेले सोयाबीन हाती आले. पहिल्या कापसाच्या वाती झाल्या तर वेचणीला महाग झाला आहे. आता रब्बीसाठी मिळेल त्या भावात सोयाबीन विक्री करावी लागत आहे. दुसरीकडे, सिंचनाची सुविधा असणारे शेतकरी हरभरा, गहू, कापूस, तुर पिकाला पाणी देण्याची धडपड करत आहेत. विद्युत असुविधेमुळे शेतकऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. याकडे संबंधित विभागाने लक्ष देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. रबी हंगामासह खरीप हंगामातील पिकांना सिंचनाची सुविधा असणारे शेतकरी पिकांना पाणी देण्यावर भर देत आहेत. दुसरीकडे, दिवसा वीज मिळत नसल्याने रात्री शेतात जागरण करावे लागत आहे.

### थॅलेसेमियाग्रस्त बालकांसाठी 7 वर्षांची सेवायात्रा



अकोला : माजी पंतप्रधान भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त ॲड. धनश्री देव स्मृती सेवा प्रकल्पाच्या संयुक्त विद्यमाने मागील सात वर्षांपासून थॅलेसेमियाग्रस्त बालकांच्या उपचारासाठी राबवण्यात येणाऱ्या रद्दी संकलन उपक्रमातून जमा झालेला निधी गुरुवारी (दि.२५) छोटेखानी कार्यक्रमात समर्पित करण्यात आला.

या वर्षीच्या उपक्रमातून संकलित करण्यात आलेला निधी पाच थॅलेसेमियाग्रस्त बालकांच्या संपूर्ण वर्षभराच्या वैद्यकीय उपचार व रक्त संक्रमणासाठी डॉ. हेडगेवार रक्तपेढीस समर्पित करण्यात आला. समाजातील नागरिकांनी दिलेल्या रद्दीच्या स्वरूपातील योगदानातून या उपक्रमाला बळ मिळाल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष अजय देशपांडे, प्रमुख पाहुणे भास्करराव कीटुकले, डॉ. हेडगेवार रक्तपेढीचे निलेश जोशी उपस्थित होते.सूत्रसंचालन दिलीपराव देशपांडे यांनी केले. मान्यवरांनी थॅलेसेमिया आजाराबाबत माहिती देताना सांगितले की, या आजाराने ग्रस्त मुलांना दर १५ ते २० दिवसांनी रक्तसंक्रमणाची आवश्यकता असते. अशा परिस्थितीत समाजातील व्यक्ती, संस्था व दात्यांचे सहकार्य मोलाचे ठरते.ॲड. धनश्री देव स्मृती सेवा उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळत असल्याचे त्यांनी नमूद केले.

मानवतेचे घडवले दर्शन मागील सात वर्षांपासून या उपक्रमाच्या माध्यमातून अनेक थॅलेसेमियाग्रस्त बालकांच्या उपचारासाठी आर्थिक सहाय्य देण्यात आले. सामाजिक बांधिलकी, सेवाभाव व मानवतेचे दर्शन या उपक्रमातून घडत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. समारोपप्रसंगी जयंतराव सरदेशपांडे यांनी आभार मानले. कार्यक्रमातून समाजात सकारात्मक संदेश देण्यात आला.

# बँकांमधील दावा न केलेल्या ठेवी परत मिळविण्यासाठी विशेष शिबिर

## २९ डिसेंबरला शिबिराचे आयोजन, जिल्ह्यात १ लाख ३६ हजार खातेदार, ४८.७२ कोटींच्या दावा न केलेल्या ठेवी

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

बुलढाणा-रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनानुसार बँकांमध्ये दीर्घकाळ दावा न झालेल्या ठेवी संबंधित खातेदारांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत मिळाव्यात, यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हा अग्रणी बँक कार्यालयामार्फत सोमवार, दि. 29 डिसेंबर 2025 रोजी दुपारी 12 वाजता जिल्हा नियोजन भवन, बुलढाणा येथे विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये 10 वर्षांपेक्षा अधिक कालावधीपासून बँक, पेंशन, विमा, शेअर, म्युच्युअल फंड आदी ठिकाणी जमा असून व्यवहार न झालेल्या रकमेबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या मोहिमेंतर्गत अशा बेवारस ठेवी संबंधित खातेदारांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत देण्यात येणार आहेत. नागरिकांनी उद्यम पोर्टल किंवा संबंधित बँक किंवा संस्थेच्या संकेतस्थळावर आपले नाव तपासून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित बँक शाखेत अर्ज करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच बुलढाणा जिल्ह्यात एकूण सुमारे 1 लाख 36 हजार 17 खातेदारांच्या दावा न केलेल्या ठेवी असून त्यांची एकूण रक्कम अंदाजे 48 कोटी 72 लाख रुपये इतकी आहे. त्यामुळे उर्वरित पात्र खातेदारांनी किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांनी विलंब न करता आपल्या जवळच्या संबंधित बँक शाखेशी संपर्क साधून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून आपली रक्कम परत घ्यावी, असे आवाहन देखील सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अग्रणी जिल्हा प्रबंधक यांनी केले आहे.




# खामगावच्या अपूर्वा विवेक लकडे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महिला क्रिकेट संघात निवड

## क्रीडा क्षेत्रात 'कलर कोट' मिळवून गुंजकर कॉलेजच्या शिरपेचात मानाचा तुरा

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

खामगाव: तालुक्यातील आवार येथील गुंजकर वरिष्ठ महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी अपूर्वा विवेक लकडे हिची संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या महिला क्रिकेट संघात निवड झाली आहे. या निवडीसह अपूर्वाने मानाचा `कलर कोट` पटकावला असून, तिच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अपूर्वा लकडे हिने क्रिकेट क्षेत्रात सातत्यपूर्ण कामगिरी करत विद्यापीठस्तरीय निवड चाचणीत आपले कौशल्य सिद्ध केले. तिची ही निवड आगामी आंतरविद्यापीठ क्रिकेट स्पर्धेसाठी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील सुविधांचा अभाव असूनही जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर अपूर्वाने हे यश संपादन केले आहे. अपूर्वाच्या या यशाबद्दल स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारकबहुउद्देशीय संस्थेचेअध्यक्ष, तथा गुंजकर एज्युकेशन हब चे अध्यक्ष प्रा. रामकृष्ण गुंजकर महाविद्यालयाचे प्राचार्य, क्रीडा शिक्षक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी तिचे कौतुक केले आहे. अपूर्वाच्या या यशामुळे ग्रामीण भागातील इतर खेळाडूंनाही प्रेरणा मिळणार असल्याचे मत क्रीडा प्रेमींनी व्यक्त केले आहे. तिच्या या गौरवास्पद कामगिरीबद्दल महाविद्यालयातुन परिसरातून तिचे विशेष कौतुक होत असून पुढील वाटचालीस संस्थेच्या वतीनेशुभेच्छा देण्यात आल्या अशी माहिती संस्थेच्या वतीने कळविण्यात येत आहे



# जगदंबा देवी मंदिरातील देवीचे मुकूट; चांदीचे डोळे व मंगळसूत्र लंपास

**दिव्य वतन /प्रतिनिधी**



खामगाव - शहरानजिकच्या घाटपुरी येथील श्री जगदंबा देवी संस्थान मंदिरात अज्ञात चोरट्याने चोरी केल्याची घटना उघडकीस आली आहे. मंदिराच्या मागील बाजूची लोखंडी खिडकी कापून चोरट्याने गणपती व देवीचे चांदीचे मुकूट, चांदीचे डोळे व मंगळसूत्र असा सुमारे ७३ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला आहे. ही चोरी २४ डिसेंबरच्या रात्री झाल्याचे निष्पन्न झाले असून २५ डिसेंबर रोजी पहाटे हा प्रकार उघड झाला. मंदिराचे पुजारी संजय शर्मा हे नेहमीप्रमाणे २५ डिसेंबर रोजी पहाटे मंदिरात गेले असता मंदिरातील साहित्य अस्ताव्यस्त दिसून आले. पाहणी केली असता देवी व गणपतीचे चांदीचे मुकूट, चांदीचे डोळे व मंगळसूत्र चोरीस गेल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. यानंतर तातडीने पोलिसांना माहिती देण्यात आली. सदर चोरी करणारा चोरटा मंदिरातील सिसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून पोलिसांनी सिसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहेत. त्यामुळे चोरट्याची ओळख पटविणे शक्य झाले असल्याची माहिती पोलिस सूत्रांकडून देण्यात आली आहे. घटनास्थळी श्वान पथक पाचारण करण्यात आले होते. चोरीची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे ठाणेदार अहेरकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप पाटील तसेच स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक सुनिल अंबुलकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. तपास अधिकाऱ्यांना योग्य त्या तपासाच्या दिशेबाबत मार्गदर्शन करण्यात आले असून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाची थेट कर्ज योजना

## एक लाखांपर्यंत कर्ज ; 29 डिसेंबरपासून अर्ज प्रक्रिया सुरु

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

बुलढाणा : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत थेट कर्ज योजना राबविण्यात येत असून, या योजनेअंतर्गत मातंग समाजातील पात्र अर्जदारांना एक लाख रुपयांपर्यंत थेट कर्ज देण्यात येणार आहे. या योजनेसाठी दि. २९ डिसेंबर २०२५ ते २७ जानेवारी २०२६ या कालावधीत अर्ज स्वीकारले जाणार आहेत. या योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्हा कार्यालयास सन २०२५–२६ या आर्थिक वर्षासाठी ५० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. प्रकल्प मर्यादा रुपये एक लाख रुपये असून त्यापैकी १० हजार रुपये अनुदान, ५ टक्के अर्थात ५ हजार रुपये लाभार्थी सहभाग व उर्वरित ८५ हजार रुपये महामंडळाचे कर्ज उपलब्ध करण्यात येणार आहे. योजनेचे आर्थिक उद्दिष्ट ५० लाख रुपये आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मातंग समाजातील १२ पोटजातींतील इच्छुक अर्जदारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे, वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे, तसेच यापूर्वी महामंडळाच्या कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराचा सिबिल क्रेडिट स्कोअर किमान ५०० असणे आवश्यक आहे. अर्ज स्वतः अर्जदाराने, आवश्यक कागदपत्रांसह दोन प्रतींमध्ये जिल्हा कार्यालयात सादर करायचे असून त्रयस्थ/मध्यस्थामार्फत अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. आवश्यक कागदपत्रे : जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, दोन फोटो, रेशन कार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड, घरटॅक्स पावती, कोटेशन, व्यवसायाच्या जागेचा पुरावा, ग्रामपंचायत/नगरपालिका नाहरकत प्रमाणपत्र किंवा शॉप ॲक्ट परवाना, व्यवसायासंबंधी तांत्रिक प्रमाणपत्र, शैक्षणिक दाखला, अनुदान/कर्ज न घेतल्याचे स्वयंघोषणापत्र, आधार-संलग्न बँक खात्याचा तपशील आदी. प्राप्त अर्जांची निवड लाभार्थी निवड समितीच्या मान्यतेनंतर मा. उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली चिठ्ठीद्वारे (लॉटरी पद्धतीने) करण्यात येईल. निवडीनंतर वैधानिक दस्तऐवजांची (एक जामीनदारासह) पूर्तता झाल्यावर कर्ज वितरण केले जाईल.



महामंडळाच्या विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयीन वेळेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, चिखली रोड, बुलढाणा येथे सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक डि. एस. पाखमोडे यांनी केले आहे.

# वै. रामचरणदास महाराज यांच्या २३व्या पुण्यतिथी निमित्ताने एक दिवसीय पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन

देऊळगाव राजा- ह.भ.प. डॉक्टर भगवान बाबा आनंद गडकर यांच्या आशीर्वादाने व ह.भ.प. गंभीर गुरुजी यांच्या प्रेरणेने दिनांक 29 डिसेंबर 2025 रोजी ह.भ.प. परमपूज्य सद्गुरु वै.रामचरण दास महाराज (आळंद फाटा) यांच्या तेविसाव्या पुण्यतिथी निमित्ताने एक दिवसीय पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजक आदर्श कॉलनीमध्ये करण्यात आल्याची माहिती मुख्य आयोजक ह.भ.प देविदास खरात व सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्रीधर जायभाये यांनी दिली आहे.

याबाबत त्यांनी दिलेली माहिती अशी की गेल्या 22 वर्षापासून अखंडितपणे ह.भ.प. परमपूज्य सद्गुरु वै. रामचरणदास महाराज यांची पुण्यतिथी धार्मिक कार्यक्रम घेऊन साजरी करण्यात येत असते हे 23 वे वर्ष असून यावर्षी सुद्धा एक दिवसीय पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे दिनांक 29 /12 /25 रोजी ह.भ.प. संत चरणदास निकम गुरुजी सल्लागार महाराष्ट्र वारकरी महामंडळ यांचे प्रवचन तर ह.भ.प. गुरुवर्य डॉक्टर भगवान बाबा आनंद गडकर यांचे काल्याचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आलेले आहे

# शहरातील मतदारांनी विकासाचा दृष्टिकोन असणाऱ्या प्रतिनिधीला निवडले

## 30 वर्षापासून मतदार संघाचे नेतृत्व करणारे व या नगरपरिषद निवडणुकीत केवळ शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी एकत्र आलेले एकेकाचे परस्परविरोधी दोन माजी आमदार यांना जनतेने नाकारले

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

देऊळगाव राजा- देऊळगाव राजा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक 2025 ही संपूर्ण बुलढाणा जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली होती त्याला कारणही तसेच होते 2024 मध्ये सिंदखेडराजा विधानसभा सभेच्या निवडणुकीमध्ये जनतेने महायुतीचे युवा उमेदवार म्हणून आमदार मनोज कायंदे यांना विधानसभेत पाठवण्याची संधी दिली या मतदारसंघाला पूर्वीपासूनच जातीवादी मतदार संघ म्हणून ओळखले जाते 1995 पासून डॉक्टर राजेंद्र शिंगणे यांनी सतत तीन वेळा या मतदार संघाचे प्रतिनिधीत्व केले यादरम्यान त्यांच्याकडे मंत्रिपद सुद्धा होते मात्र अपेक्षित असा विकास या मतदार संघात झालेला दिसून आलेला नाही. त्यानंतर डॉक्टर शशिकांत खेडेकर यांना 2014 मध्ये जनतेने संधी दिली त्यांनी समाज मंदिर, पुल ,रस्ते बांधण्यासाठी यांनी कोट्यवधीचा निधी आणला मात्र विकास कामे करताना खरा विकास कोणाचा झाला आहे हे जनतेला कळून गेले त्यानंतर 2019 मध्ये परत डॉक्टर राजेंद्र शिंगणे विरुद्ध डॉक्टर शशिकांत खेडकर अशी लढत झाली

यामध्ये विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कधीच पराभूत न झालेले डॉक्टर राजेंद्र शिंगणे हे निवडून आले व यावेळेस जनतेने त्यांच्याकडून भरघोस विकास होईल अशी अपेक्षा केली होती मात्र अपेक्षाचा भंग झाला, नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत एकेकाळचे कट्टर विरोधक केवळ शहराच्या विकासासाठी एकत्र आलेले डॉ राजेंद्र शिंगणे व डॉ.शशिकांत खेडेकर यांनी आमदार मनोज कायंदे यांच्या महायुतीला पराभूत करण्यासाठी कंबर कसली व आकोट विकास आघाडी पुरस्कृत नगर विकास आघाडी ची अभद्र युती केली. मात्र जनतेने दोघांना सपशेल नाकारले.शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकपूर्णा धरणावरून शासनाने 2014 मध्ये 14 कोटी रुपये खर्चाची पाणीपुरवठा योजना मंजूर केली व 2035 साली शहराची जी लोकसंख्या राहील त्या दृष्टीने सर्वांना मुबलक पाणी मिळेल असे कागदोपत्री नियोजन करण्यात आले 2016 मध्ये खडक पूर्णा जलाशय ते जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत परंतु सर्व कामे पूर्ण करण्यात आली. मात्र जनतेला बारा दिवसाआड पाणीपुरवठा केवळ तांत्रिक अडचणी दूर न केल्याने मिळू लागले प्रत्येक वेळी शहरातील विविध विकास कामाचा मुद्दा समोर आला की प्रत्येक नागरिक यांच्या मुखातून एकच विषय निघत असे आम्हाला पाणी वेळेवर व मुबलक प्रमाणात द्या मात्र आजपर्यंत पाणी मुबलक असूनही व अनेक नागरिकांचे घरात साठवन क्षमता कमी असल्यामुळे व नळाला पाणी 12 दिवसानंतर येत असल्यामुळे धरण उशाशी अन कोरड घश्याशी अशी श्रींच्या नगरीतील नागरिकाचे झालेले आहे.विकासाचा दृष्टिकोन असणाऱ्या लोकप्रतिनिधींना साथ द्यायची व शहराच्या सर्वांगीण विकास त्यांच्याकडून करून घ्यायचा या नगर परिषदेच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचे युवा आमदार मनोज कायंदे, राष्ट्रवादीचे जिल्हा अध्यक्ष ॲड.नाझेर काझी, माजी नगराध्यक्ष संतोष खांडेभराड, सतिष कायंदे, हाजी सिद्दिक हाजी उस्मान मिरचीवाले, धनशिराम शीपणे,भाजपाचे डॉक्टर गणेश मांटे, सुभाष दराडे, प्रकाश गिते, सुनिल शेजुळकर , गजानन काकड, प्रा.दिलीप झोटे, भगवान मुंढे, राजेश भुतडा, अशपाक शाह, गौस सेठ मिरची वाले, बाबासाहेब कासारे, संतोष पुजारी, म.रफिक म.शफी,सदाशिव मुंढे यांनी सुरुवातीपासूनच सूक्ष्म नियोजन करून प्रचारही नियोजनबद्ध करून शक्य तेवढ्या मतदारापर्यंत जाण्याचा प्रमाणिकपणे प्रयत्न केला आमदार मनोज कायंदे यांचे नेतृत्वात त्यांनी पहिल्यांदाच निवडणुकीची सूत्रे हातात घेतली

शहरातील जनतेत कोणत्या प्रभागात कोणत्या व्यक्तीची कशी प्रतिष्ठा आहे मतदार त्यास निवडूण देतील का याची चाचपणी अगदी सूक्ष्मपणे केल्यानंतर जातीय समीकरण सांभाळत 18 पगड जाती धर्माला न्याय देण्याचा प्रयत्न त्यांच्याकडून या निवडणुकीत करण्यात आल्याचे बोलले जात आहे या नगर परिषदेच्या निवडणुकीमध्ये अकोट विकास आघाडी पुरस्कृत नगर विकास आघाडीतील अनेक उमेदवारांना अति आत्मविश्वास नडला तर यामध्ये या निवडणुकीत एका विशिष्ट समाजाचे सर्वच नेते एकत्र आल्याने परत एकदा या निवडणुकीला जातीय वादाचे रंग देण्याचा केविलवाणा प्रयत्न करण्यात आल्याचे जनतेला दिसले .

या नगर परिषद निवडणुकीत आमदार मनोज कायंदे यांच्या महायुतीला स्पष्ट बहुमत प्राप्त झाल्या नंतर शहरवासीयांच्या अपेक्षा आता आमदार मनोज कायंदे व नवनियुक्त नगराध्यक्षा माधुरी शिपणे व महायुतीचे निवडूण आलेले सर्व नगर सेवक यांच्याकडून वाढल्या आहेत व युद्ध पातळीवर पाणी पुरवठा वितरण व्यवस्था चे कामे करून पाणी मुबलक व वेळेवर मिळेल का याकडे जनतेचे लक्ष लागले आहे.

# तहसीलदार अजित जंगम यांच्या हस्ते मौलाना आझाद कॅम्पस, नांदुरा येथे भव्य आनंद मेळाव्याचे उद्घाटन !!!

**दिव्य वतन /प्रतिनिधी**

नांदुरा : मौलाना आझाद कॅम्पस, नांदुरा येथे मौलाना आझाद प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व मजिदिया हायस्कूल नांदुरा च्या वतीने आयोजित करण्यात आलेला आनंद मेळावा मोठ्या उत्साहात व जल्लोषात संपन्न झाला. या मेळाव्याचे उद्घाटन नांदुराचे तहसीलदार श्री अजित जंगम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. अब्दुल रफीक (अध्यक्ष), मोहम्मद तौसिफ (सचिव), इंजि. नितीन कोठारी (USA), हाजी अफजल, मोहम्मद इमरान व मोहम्मद रेहान यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवर पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. उद्घाटनानंतर मान्यवर पाहुण्यांनी मेळाव्यातील सर्व दुकानांना भेट देत विद्यार्थ्यांनी मांडलेल्या उपक्रमांचे कौतुक केले. मेळाव्यात विविध प्रकारच्या चविष्ट व्यंजनांचे 75 स्टॉल लावण्यात आले होते. सुमारे २००० विद्यार्थी, पालक व पाहुण्यांनी या व्यंजनांचा मनमुराद आस्वाद घेतला. या आनंद मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी अशफाक खान सर व त्यांच्या संपूर्ण चमूने विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनबद्ध मेहनतीमुळे मेळावा यशस्वी ठरला. कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उपक्रमशीलता, संघभावना व व्यवस्थापन कौशल्यांचा विकास झाला, असे



# सत्तेत असूनही विरोधात

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एक विचित्र पण तितकाच महत्त्वाचा विरोधाभास पाहायला मिळतो आहे. राज्यात भाजप, शिंदेसेना आणि अजित पवारांचा राष्ट्रवादी गट मिळून सत्तेत आहेत. उपमुख्यमंत्री पद अजित पवारांकडे आहे. तरीही महानगरपालिका निवडणुकांच्या मैदानात चित्र वेगळं दिसतंय. सत्तेत एकत्र असलेले हे घटक, निवडणुकांमध्ये मात्र वेगवेगळ्या दिशांनी जाताना दिसत आहेत.

लोकमतमध्ये प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, भाजप आणि शिंदेसेना अनेक महानगरपालिकांमध्ये एकत्र लढण्याच्या तयारीत आहेत. मात्र अजित पवारांचा राष्ट्रवादी गट या युतीपासून जाणीवपूर्वक अंतर राखतो आहे. अनेक ठिकाणी हा गट स्वतंत्र लढत आहे, तर काही ठिकाणी थेट सरकारविरोधात भूमिका घेताना दिसतो आहे.

ही भूमिका केवळ नाराजी किंवा अहंकारातून आलेली नाही. यामागे एक खोलवरची राजकीय गणितं आहेत. महानगरपालिका निवडणुका या केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका नसतात. त्या पक्षांची संघटनात्मक ताकद, कार्यकर्त्यांचा प्रभाव आणि जनाधार यांची खरी कसोटी असते.पश्चिम महाराष्ट्रात हे गणित सर्वाधिक स्पष्टपणे दिसतं. पुणे आणि पिंपरी-चिंचवडसारख्या शहरांमध्ये भाजप आणि शिंदेसेना मोठ्या प्रमाणावर एकत्र येत आहेत. मात्र अजित पवारांचा गट या युतीत सहभागी न होता स्वतंत्र लढण्याचा निर्णय घेतो आहे. कारण पश्चिम महाराष्ट्र हा अजित पवारांच्या राजकारणाचा कणा मानला जातो. आजही या भागात राष्ट्रवादीची संघटना, कार्यकर्ते आणि स्थानिक नेतृत्व मजबूत आहे, असा त्यांचा विश्वास आहे.

या माध्यमातून अजित पवारांना एक संदेश द्यायचा आहे. शरद पवारांशिवाय राष्ट्रवादी टिकू शकते का, जिंकू शकते का, याचं उत्तर या निवडणुकांतून मिळणार आहे. त्यामुळेच इथे कोणतीही तडजोड न करता स्वतंत्र शक्तिपरीक्षा घेण्याचा निर्णय घेतला जातो आहे.

उत्तर महाराष्ट्रात मात्र परिस्थिती थोडी गुंतागुंतीची आहे. नाशिकसारख्या शहरांमध्ये अजित पवार गट आणि भाजप यांच्यात चर्चा सुरू असली, तरी ठोस युती अजून जाहीर झालेली नाही. इथे दोन्ही बाजू सावध पावलं टाकताना दिसतात. गरज भासली तर एकत्र येण्याची शक्यता जिवंत ठेवत, पण स्वतंत्र लढण्याची तयारीही सुरू आहे. ही एक प्रकारची 'वेट अँड वॉच' रणनिती आहे.

मराठवाड्यात चित्र अधिक स्पष्ट आहे. या भागात अजित पवार गटाने बहुतांश ठिकाणी महायुतीपासून दूर राहण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. कारण मराठवाड्यात आजही शरद पवार गटाचा प्रभाव खोलवर आहे. त्यामुळे इथे अजित पवारांसाठी ही केवळ निवडणूक नसून, अस्तित्वाची लढाई आहे. पराभव झाल्यास त्याचा थेट परिणाम राज्यातील त्यांच्या राजकीय वजनावर होऊ शकतो.

मुंबई महापालिकेत तर ही लढाई अधिकच निर्णायक ठरणार आहे. मुंबईत अजित पवारांचा गट स्वतंत्र लढण्याच्या तयारीत आहे. भाजपसोबत थेट युती नाही आणि शरद पवार गटाशी थेट सामना. मुंबई महापालिका म्हणजे केवळ आर्थिक सत्ता नाही, तर राजकीय प्रतिष्ठेचा किल्ला आहे. इथला निकाल भविष्यातील सत्तासमीकरणांवर मोठा प्रभाव टाकू शकतो.


या सगळ्या रणनितीचा भाजप आणि शिंदेसेनेवर परिणाम काय होईल, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. एका बाजूला अजित पवार वेगळे लढल्याने धर्मनिरपेक्ष मतांचं विभाजन होऊ शकतं, ज्याचा फायदा भाजप-शिंदेसेनेला होऊ शकतो. मात्र दुसऱ्या बाजूला काही शहरांत त्रिकोणी लढती निर्माण होऊन भाजपचीही मतं फुटण्याचा धोका आहे. म्हणजेच, अजित पवारांची ही खेळी भाजपसाठीही दोन्ही बाजूंनी धार असलेली तलवार आहे. निकाल काहीही असो, त्याचे परिणाम थेट राज्याच्या राजकारणावर दिसणार आहेत. जर या निवडणुकांमध्ये अजित पवारांचा गट अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी करतो, तर राज्य पातळीवर त्यांची सौदेबाजीची ताकद वाढेल. भाजपसोबत भविष्यातील युती अटींवर ठरवता येईल. पण जर पराभव झाला, तर भाजपवरील अवलंबित्व वाढेल आणि शरद पवार गटाला नैतिक बळ मिळेल.म्हणूनच, ही लढाई केवळ महानगरपालिका जिंकण्याची नाही. ही लढाई आहे — राष्ट्रवादी कोणाची, नेतृत्व कुणाचं आणि उद्याच्या महाराष्ट्रात सत्ता कुणाच्या हातात असणार, हे ठरवण्याची.

सत्तेत असूनही विरोधात जाण्याची ही राजकीय खेळी, महाराष्ट्राच्या राजकारणात दीर्घकालीन परिणाम घडवणारी ठरणार आहे.

# सफर विज्ञानाची भाग -१८ सुमेरियन संस्कृती












खूप वर्षांपूर्वी, आजच्या नकाशांवर ज्या प्रदेशाला इराक आणि कुवेत म्हणून ओळखले जाते, त्या प्रदेशात मानवजातीने एक विलक्षण पाऊल टाकले. ही कथा आहे सुमेरियन संस्कृतीची — मानवाच्या इतिहासातील पहिल्या ज्ञात नागरी संस्कृतीची. 'सफर विज्ञानाची' या मालिकेत आपण आज त्या क्षणापर्यंत मागे जातो, जिथे शेती, शहरं, लेखन, गणित आणि आकाशाकडे पाहून विचार करण्याची सुरुवात झाली. कल्पना करा, हजारो वर्षांपूर्वी मानव अजूनही निसर्गाच्या मर्जीवर अवलंबून होता. पावसावर, नदीवर, ऋतूंवर त्याचे जीवन ठरायचे. अशाच काळात, इ.स.पू. ६५०० ते ३८०० या काळात, 'उबैद' नावाचे लोक मेसोपोटेमियाच्या दक्षिण भागात स्थिर झाले. हे लोक आज आपण ज्याला सुमेर म्हणतो त्या भूमीचे पहिले रहिवासी मानले जातात. पुरातत्त्वीय पुराव्यांवरून असे दिसते की उबैद लोक शेतकरी होते. त्यांनी शेती केली, स्थिर वसाहती उभारल्या आणि त्या वसाहती समृद्धही झाल्या. म्हणजेच, भटक्या जीवनातून स्थिर समाजाकडे जाण्याचा तो निर्णायक टप्पा होता. अलीकडील संशोधनातून एक रंजक गोष्ट समोर येते. हे उबैद लोक मूळचे कदाचित कॅस्पियन समुद्र, हिंदूकुश पर्वतरांग आणि तुर्कमेनिस्तानमधील कोपेत पर्वतांच्या दरम्यानच्या प्रदेशातून आले असावेत. त्या भागात दीर्घकाळ पडलेल्या दुष्काळामुळे शेती अशक्य झाली असावी. पाण्याचा अभाव, जमिनीचा कोरडेपणा आणि जगण्यासाठी आवश्यक अन्नसाधनांची कमतरता — या सगळ्यामुळे त्यांनी आपली मातृभूमी सोडली. नदीकाठी सुपीक जमीन असलेल्या दक्षिण मेसोपोटेमियाकडे त्यांचा प्रवास सुरू झाला. युफ्रेटीस नदीच्या काठावर त्यांना पुन्हा जीवनाची आशा दिसली. इ.स.पू. ४००० च्या सुमारास, हेच लोक आता 'सुमेरियन' म्हणून ओळखले जाऊ लागले. या काळात सुमेर ही एकसंध राज्यव्यवस्था नव्हती, तर भिंतींनी वेढलेल्या स्वतंत्र शहर-राज्यांची मालिका होती. प्रत्येक शहर म्हणजे एक स्वतंत्र जग होते — स्वतःचा राजा, देवता, कायदे आणि परंपरा. शहराच्या मध्यभागी उंच झिगुरात (Ziggurat) असे. झिगुरात म्हणजे देवतेचे मंदिर — पण ते केवळ धार्मिक केंद्र नव्हते; ते सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय केंद्रही होते.

उरुक, उर, किश, निप्पूर, लागाश — ही नावे ऐकताना आज ती केवळ अवशेष वाटतात, पण त्या काळी ही शहरे मानवी संस्कृतीच्या प्रगतीची प्रयोगशाळा होती. उरुकला तर जगातील पहिले शहर मानले जाते. काही शहरांची लोकसंख्या ८०,००० पेक्षा अधिक होती, ही गोष्ट त्या काळाच्या मानाने थक्क करणारी आहे. आजपर्यंत सुमेरियन संस्कृतीची किमान अठरा शहरे उत्खननात सापडली आहेत आणि ही सर्व शहरे युफ्रेटीस नदीच्या शाखा व कालव्यांच्या आसपास वसलेली होती. पाणी हेच जीवन होते, आणि सुमेरियनांनी ते ओळखले होते. सुमेरियन संस्कृती जवळजवळ काही हजार वर्षे टिकून राहिली. इ.स.पू. २००० च्या आसपास बाह्य आक्रमणांमुळे आणि इतर मेसोपोटेमियन संस्कृतींमध्ये विलीन झाल्यामुळे तिचा स्वतंत्र अस्तित्वाचा अंत झाला. पण तोपर्यंत सुमेरने मानवजातीला एक अमूल्य देणगी दिली होती — पूर्ण विकसित भाषा, लेखनपद्धती आणि तंत्रज्ञान. सुमेर अचानक उदयास आले असे वाटते, कारण ते अपूर्ण अवस्थेत नव्हते; ते आधीच प्रगत होते. हीच गोष्ट आजही इतिहासकारांना आणि शास्त्रज्ञांना विचार करायला भाग पाडते. सुमेरियन वारशातील सर्वात गूढ आणि आकर्षक वस्तू म्हणजे 'सुमेरियन किंग्स लिस्ट'. ही मातीच्या फलकांवर कोरलेली लेखनमालिका आहे, जी आज वेगवेगळ्या तुकड्यांत सापडते. या यादीत राजांची वंशावळ दिली आहे — पण ही साधी राजसूची नाही. यात काही राजांची कारकीर्द हजारो वर्षांची दाखवली आहे. इतिहासकारांनी काही राजांचे अस्तित्व मान्य केले आहे, पण इतकी दीर्घ आयुष्ये कशी शक्य होती, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. या यादीची सुरुवात सुमारे २,६६,००० वर्षांपूर्वी दाखवली जाते, जेव्हा 'राजसत्ता स्वर्गातून खाली उतरली' असे म्हटले आहे. ही घटना एरिडू या शहरात घडली, असे वर्णन आहे. एरिडू हे सुमेरियन संस्कृतीचे आद्य केंद्र मानले जाते, ज्याचा कालखंड साधारण इ.स.पू. ५४०० ते ६०० असा मानला जातो. या राजसूचीत महापुराचाही उल्लेख आहे, जो बायबलमधील प्रलयकथेशी साम्य दर्शवतो. महापुरापूर्वी पाच शहरांमध्ये राजसत्ता होती, असे लिहिले आहे — एरिडू, बद-तिबिरा, लार्सा, सिप्पार आणि शुरुप्पक. आजही पुरातत्त्वज्ञ या शहरांचे संपूर्ण अस्तित्व आणि स्वरूप शोधत आहेत. सुमेरियनांची आकाशाकडे पाहण्याची दृष्टीही तितकीच विलक्षण होती. त्यांच्या खगोलशास्त्राचे थेट पुरावे फारसे उपलब्ध नाहीत, पण जे तुकडे मिळाले आहेत, ते थक्क करणारे आहेत. एका मातीच्या चकतीवर कोरलेला ताऱ्यांचा नकाशा आजही संशोधकांना विचारात पाडतो. नंतरच्या बॅबिलोनियन खगोलशास्त्रात अनेक ताऱ्यांची नावे सुमेरियन भाषेत आढळतात, याचा अर्थ ज्ञानाची परंपरा पुढे चालू राहिली होती. एका सुमेरियन सिलिंडर सीलवर सूर्य मध्यभागी आणि त्याच्या भोवती अकरा खगोलीय वस्तू दाखवलेल्या आहेत. काही अभ्यासकांच्या मते, सुमेरियनांना सौरमालेची संकल्पना माहीत होती आणि सूर्य केंद्रस्थानी आहे, ही जाणीवही त्यांना असावी. या अकरा वस्तूंमध्ये नऊ ग्रह आणि दोन उपग्रह असावेत, असा अंदाज व्यक्त केला जातो. आणखी एक बारावी वस्तू सौरमालेच्या बाहेर दाखवलेली आहे. आज आधुनिक शास्त्रज्ञही सौरमालेच्या पलीकडे एखाद्या मोठ्या ग्रहाचा शोध घेत आहेत — ही केवळ योगायोगाची बाब आहे की प्राचीन ज्ञानाची आठवण, हे सांगणे कठीण आहे. सुमेरियन संस्कृतीचे तीन प्रमुख कालखंड मानले जातात. उबैद कालखंड (इ.स.पू. ६५००–४१००) हा स्थिर शेती आणि वसाहतींचा काळ. उरुक कालखंड (इ.स.पू. ४१००–२९००) हा शहरांच्या उदयाचा, व्यापाराचा आणि लेखनाच्या विकासाचा काळ. आणि प्रारंभिक राजवंशीय कालखंड (इ.स.पू. २९००–२३३४) हा राजसत्ता, युद्धे आणि सांस्कृतिक परिपक्वतेचा काळ होता. या संस्कृतीने मानवजातीला जे दिले, त्याची यादी फार मोठी आहे. माती मुबलक असल्यामुळे कुंभारकाम फुलले. प्राणीपालन आणि शेती अधिक शास्त्रीय पद्धतीने केली जाऊ लागली. वास्तुकलेत झिगुरातसारख्या भव्य रचना उभ्या राहिल्या. सुतारकाम, विणकाम, आंबवणीतून बीअरनिर्मिती, गणित, खगोलशास्त्र — हे सारे सुमेरियन समाजाचा भाग होते. लेखनासाठी त्यांनी क्युनिफॉर्म (Cuneiform) लिपी विकसित केली, जी पुढील हजारो वर्षे वापरात राहिली. आज आपण जेव्हा शेती करतो, नोंदी ठेवतो, आकडे मोजतो किंवा आकाशाकडे पाहून प्रश्न विचारतो, तेव्हा त्या सगळ्याची मुळे सुमेरमध्ये सापडतात. प्राचीन मेसोपोटेमियाची पायाभरणी सुमेरने केली. आजपर्यंत सुमेरपूर्व संस्कृतींचे ठोस पुरावे मिळाले नाहीत, तोपर्यंत सुमेर हीच आधुनिक समाजव्यवस्थेची पहिली पायरी मानावी लागते. 'सफर विज्ञानाची' या प्रवासात सुमेर आपल्याला एक गोष्ट शिकवते — मानवाची खरी ओळख त्याच्या प्रश्नांमध्ये आहे. "मी कुठून आलो?", "हे जग कसे चालते?", "आकाशात काय आहे?" — या प्रश्नांची पहिली संघटित उत्तरे सुमेरियनांनी शोधण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच सुमेर ही केवळ एक संस्कृती नाही; ती मानवी जिज्ञासेची सुरुवात आहे.

**प्रा.डॉ.जयसिंग गाडेकर**
रसायनशास्त्र विभागप्रमुख
मा.बाळासाहेब जाधव महाविद्यालय,आळे.
तालुका- जुन्नर,जिल्हा-पुणे
मोबाईल क्रमांक - ९९७०३४१६४६

# ...तर नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल!

३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाचे स्वागत दारू पिऊन करण्याकडे तरुण वर्गाचा कल असतो. नववर्षाच्या पूर्वसंध्येला पब किंवा क्लब मध्ये जाऊन पार्टी करणे, दारू पिऊन गाडी चालवणे, हुल्लडबाजी करणे, सायलंसरच्या पुंगळ्या काढून आवाज करणे, मोठ्या आवाजाचे फटाके वाजवणे, डिजेच्या किंवा लाऊड स्पिकरच्या कर्णकर्कश आवाजात भिभत्स नृत्य करणे यासारख्या गोष्टी तरुण वर्गामार्फत केल्या जातात. यावर्षी तर हे प्रमाण खूपच वाढणार आहे कारण शासनानेच पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू ठेवण्यास परवानगी दिली आहे. पब, क्लब, रेस्टॉरंट रात्रभर सुरू राहणार असल्याने तरुणांनी आतापासूनच पार्टीची तयारी सुरू केली आहे. नववर्षाचे अशाप्रकारे स्वागत करणे म्हणजे कायदा सुव्यवस्थेचा भंग करणे हे माहीत असूनही अशा गोष्टी केल्या जातात. अलीकडे तर या गोष्टी खूपच वाढल्या आहेत. दारू पिऊन नववर्षाचे स्वागत करण्याची फॅशनच हल्ली रूढ झाली आहे. नववर्षाच्या पूर्वसंध्येला दारू पिलीच पाहिजे असाच समज तरुण वर्गाचा झाला आहे. दारू न पिताही नववर्षाचे स्वागत करता येते यावर त्यांचा विश्वासच नाही त्यामुळेच नववर्षाचे स्वागत दारू पिऊनच केले जाते. दारूचे दुष्परिणाम माहीत असूनही या गोष्टी केल्या जातात. दारू पिऊन भरधाव वेगात गाड्या चालवतात. दारू पिऊन भरधाव वेगात गाडी चालवल्याने बऱ्याचदा अपघात होतात. या अपघातात काही जण मरण पावतात तर काही जण जखमी होतात काही तर काही जण कायमचे जायबंदी होतात. दारू पिऊन गाडी चालवल्याने झालेल्या अपघातात घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंब रस्त्यावर येते. दारू पिऊन गाडी चालवणे म्हणजे स्वतःसह इतरांचाही जीव धोक्यात घालणे म्हणूनच नववर्षाचे स्वागत करताना स्वतःसह इतरांना त्रास होणार नाही याचे भान सर्वांनी ठेवावे. सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नव्या वर्षाचे स्वागत करताना बंधनाची ऐशीतैशी होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यायला हवी.

नववर्षाचे स्वागत म्हणजे चांगल्या वाईट गोष्टी दूर सारुण नववर्षाच्या सूर्योदयाच्या साक्षीने नव संकल्पाचा अवलंब करणे, त्याचे निश्चित धोरण ठरवणे, सत्याची कास धरणे आणि नव्या जोमाने, नव्या उत्साहाने कामाला लागणे. यामुळे नव्या वर्षाचे स्वागत करताना पाश्चात्यांचे अंधानुकरण बंद करून प्रत्येकाने चांगले काम करण्याचा संकल्प केला पाहिजे.

आज जगाचा पोशिंदा संकटात आहे. आस्मानी आणि सुलतानी संकटांने पिचलेला बळीराजा आत्महत्या करीत आहेत. देशाचे रक्षणकर्ते जवान दहशतवाद्यांच्या, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात शहीद होत आहेत. दारूच्या नशेत नववर्षाचे स्वागत करण्यापेक्षा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची मुले, शहीद जवानांची मुले तसेच अनाथ मुलांना मदत करून आपण नव वर्षाचे स्वागत करू शकतो. आर्थिकदृष्ट्या गरीब कुटुंबाना आर्थिक मदत करून त्यांच्या मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गोरगरीब मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करून, वृद्धाश्रमाला, अनाथ आश्रमाला आर्थिक मदत करून आपण नववर्ष साजरे करू शकतो. रक्तदान म्हणजे सर्वश्रेष्ठ दान. नववर्षाची सुरुवात जर आपण रक्तदान करून केली तर एखाद्या रुग्णाचे प्राण वाचवल्याचे समाधान आपल्याला मिळू शकते. नवीन वर्षात अवयव दानाचा संकल्पही आपण करू शकतो. छोटे छोटे संकल्प आपल्याला भविष्यात मोठा फायदा करून देणारे ठरू शकतात त्यामुळे आपले आणि आपल्या प्रिय जणांचे जीवन अधिक समृध्द आणि अर्थपूर्ण होऊ शकते.

जुने जाऊ द्या मरणाागुनी.....
जाळूनी किंवा पुरूनी टाका...
.

या कवितेच्या ओळी प्रमाणे मागील वर्षीच्या सर्व चांगल्या वाईट भावना पुसून नव्या वर्षाचे स्वागत करायला हवे. सामाजिक बांधिलकीचे ऋण सेवेतून व्यक्त करण्याचा तसेच अपप्रवृत्तींना आळा घालण्याचा संकल्प केला तर, नववर्षाचा आनंद द्विगुणित होईल.

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# किस्सा मोबाईल का ! भल्या माणसाला मोबाईल रस्त्यावर सापडला म्हणूनच भेटला रें बाबा ! गजानन महाराजांची कृपाच म्हणा : PSI उपाध्याय

किस्सा मोबाईल का !

भल्या माणसाला मोबाईल रस्त्यावर सापडला म्हणूनच भेटला रें बाबा ! गजानन महाराजांची कृपाच मणा : PSI उपाध्याय

अजनी पोलीसांची कामगिरी जंणू महाराजांची कृपा!

मी देवराव प्रधान पत्रकार भवन येथून शुक्रवारच्या रात्री साडेआठ वाजता. घरी जाण्यासाठी निघालो जातेवेळेस, अजनीत पोहोचलो. तिथेच मला एनडीटीव्हीचे मराठी पत्रकार प्रवीण मुधोळकर यांचा फोन आला की कुठे आहे ? त्यांना सांगितलं मी आता सध्या अजनी मध्ये गाडीवर आहे. त्यांचा फोन मी रिसिव्ह केला आणि मोबाईल लेप्टसाईटच्या खिशात जॉकेट मध्ये टाकला. अजनी फुल क्रॉस केल्यानंतर अजनीच्या पुलावरून जातेवेळेस वंजारी नगरच्या पाण्याच्या टाकीच्या जवळपास असं मला जाणवलं की, काहीतरी पडलं पण मी थांबलो नाही मी पुढे निघून गेलो. कारण मला लवकर घरी जायचं होतं. माझ्या मुलीला भूक लागली तिला पार्सल घेऊन जायचं होतं. म्हणून मी मुलीला फोन करण्यासाठी फोन बघितला तर माझ्या खिशात मोबाईल नव्हता गाडीतही नव्हता, बॅगमध्येही नव्हता. मला पूर्ण विश्वास होता की, माझा फोन पडला ? म्हणून मी लगेच.. गजानन महाराजाला आराधन केली की, देवा माझा फोन मला भेटू दे ! त्वरित मी अयोध्यानगर मधूनच परत वापसी अजनी पुलावर आलो. तिथून लेफ्ट साईडला पहात पहात पोलीस स्टेशन पर्यंत पोहोंचलोच मला असं वाटलं की, मोबाईल हरवला आणि तो मिळणार नाही म्हणून मी पोलीस स्टेशन गाठलं तिथे PSI उपाध्याय साहेब यांना भेटलो त्यांना आपबिती सांगितली की, सर माझा मोबाईल गाडीवर येतानी पुलावर पडला आणि तो हरविला त्यामुळे माझा फोन ब्लॉक करा त्यांना माझा परिचय दिला. मी पत्रकार आहे आणि मी पत्रकार भवनात कर्मचारी आहे. माझे मित्र पोलीस स्टेशनमध्ये अरुण सातपुते आहे. त्यांच्या संपर्कात मी आहे. तुम्ही माझी मदत करा. त्यांना सर्व घटनाक्रम सांगितल्यानंतर थोड्या वेळाने त्यांनी विचारलं की तुमचा फोन पोलीस स्टेशन मध्ये जमा केलेला आहे. कोणतरी भला माणूस आला आणि त्यांनी जमा केला. माझं पूर्ण ऐकल्यानंतर त्यांनी मला फोन परत केला. परंतु ज्या वेळेस फोन पडला त्याच वेळेस माझ्या मुलीचा त्या फोनवर फोन आला की बाबा माझ्यासाठी पार्सल आणा मला भूक लागली. हे ऐकून त्या अनोळखी व्यक्तीने फोन उचलला आणि कानावर ऐकू आले बाबा तुम्ही पत्रकार भवनात आहेत का ? तर तिला दुसऱ्या व्यक्ती चा आवाज आला तर तुम्ही कोण आहेत ? यह फोन मुझे मिला है । अजनी पुल के ऊपर से मै उमेश ठाकूर बोल रहा हु । तर माझ्या मुलीने विचारपूस केली त्यांची माहिती घेतली ते चंद्रमणी नगर येथे राहतो असे म्हणाले आणि त्यांना सांगितलं की आपण पोलीस स्टेशनमध्ये फोन जमा करा. परत त्याच फोनवर NDTV चे मराठी पत्रकार प्रवीण मुधोळकर यांचा फोन आला तर त्याच व्यक्तीने उचलला आप कोण बोल रहे है। मुझे फोन मिला है। त्यांनी पण सांगितले की पोलीस स्टेशनला फोन जमा करा. त्यानंतर माझे कर्मचारी जितेंद्र सोनकांबळे यांनी फोन केला तर तो त्यांनी रिसिव्ह केला त्या व्यक्तीने आणि सांगितले की माझे मित्र मानेवाडा चौकात येतील त्यांना तुम्ही तिथं देऊन द्या. मी त्यांना कॉल करून सांगतो. परंतु त्यांना काय झालं म्हणून असं माहित नव्हतं ! परत माझ्या मुलीने फोन केला की तुम्ही पोलीस स्टेशनमध्येच मोबाईल जमा करा.

मी शोध घेतला परंतु मला फोन मिळालाच नाही म्हणून मी पोलीस स्टेशनमध्ये पोहोचताच फोन घेतल्यानंतर लगेच घरून फोन आला की, तुम्ही कुठे आहे. त्यांना सांगितलं की मी विश्वकर्मानगर मध्ये आहे. तुम्ही तिथेच थांबा आम्ही पोलीस स्टेशनला येतो आहे. मी तसंच सांगितलं की, फोन मला मिळाला. मी पोलीस स्टेशन मधून निघालो आहे. तुम्ही घरी वापस या. अशा प्रकारे माझ्यासोबत आज किस्सा झालेला आहे. माझ्या कुटुंबाला असे वाटले की बाबाचा फोन या व्यक्तीला सापडला परंतु माझे बाबा कुठे गेले ? या टेन्शनमध्ये होते. परंतु त्या भल्या व्यक्तीने फोन जमा केल्यानंतर माझ्या घरच्यांना अडचणीत टाकलं आणि ते घाबारले ! असं होऊ नये म्हणून सांगतोय की गाडीवर फोन उचलू नका ! बरोबर फोन जपून ठेवा ! जेणेकरून आपला मोबाईल नंबरचा वापर कोणीही करू नये यासाठी मी आपणास सांगतो की या भल्या माणसाने जी माझी मदत केली त्याचे मी मनापासून खूप खूप धन्यवाद मानतो आणि मला तेथील पोलिसांनी सहकार्य केलं त्याबद्दल त्यांचेही धन्यवाद मानतो.

मोबाईल अशी वस्तू आहे जेणेकरून माणूस त्याच्या बिना अधुरा आहे. सर्व काही मोबाईलच आहे. आज जर मोबाईल माझ्या हातातून निघून गेला असता तर मला किती त्रास झाला असता हे मलाच माहीत.......

सन 2025 वर्ष हे मला सुखाचे आनंदाचे गेले सरते शेवटी अशा प्रकारे माझ्या सोबत किस्सा घडला ! माऊलींची कृपा होती म्हणूनच माझा फोन मला परत मिळाला......

जाने वाले साल को सलाम
आने वाले को साल को सलाम
आप सभी को 2026 साल कि शुभकामनाए- हॅपी न्यू इयर- हॅपी न्यू इयर- हॅपी न्यू इयर



दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

१ २ ३ ४ ५ ६

## महत्त्वाचे...



### अभ्यासा व्यतिरिक्त अवांतर वाचन केल्यामुळे व्यक्तिमत्वाचा विकास

अहिल्यानगर -बालवयात केलेल्या वाचनाने मुलांची भाषा सुधारण्यास मदत होते. अभ्यासाव्यतिरिक्त अवांतर वाचन केल्याने व्यक्तिमत्त्व विकास होतो. पालकांनी स्वतः वाचन करून मुलांना देखील त्यांच्या वयाला साजेसे अनेक पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन उद्योजक तथा लेखक सचिन चोभे यांनी केले. श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला प्राथमिक विभाग सावेडी येथे वार्षिक पारितोषिक वितरण व विविध गुणदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.याप्रसंगी सहाय्यक शिक्षण निरीक्षक, जिल्हा परिषद, अहिल्यानगर श्रीराम थोरात तसेच लेखक व व्यावसायिक सचिन चोभे यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शालेय समिती चेअरमन सुरेश क्षीरसागर उपस्थित होते. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष दीपक ओहोळ, चेअरमन विकास सोनटक्के, श्रीपाद कुलकर्णी, अ‍ॅड. किशोर देशपांडे, संध्या कुलकर्णी, स्वप्नील कुलकर्णी आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या क्रीडा प्रात्याक्षिकांनी उपस्थितांची मने जिंकली. प्रशालेच्या मुख्याध्यापक गुंफेकर यांनी प्रास्ताविकातून मुलांना व पालकांना संदेश दिला.

### आजच्या स्पर्धेच्या काळामध्ये सतत अपडेट राहणे आवश्यक



मुंबई : यश सहज मिळत नाही, त्यासाठी कष्ट, प्रयत्न आणि सातत्य आवश्यक आहे. ही त्रिसूत्री अंगीकारली तरच यशाचे शिखर गाठता येते, असे प्रतिपादन मार्कंडेय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य बाळकृष्ण गोटीपामूल यांनी केले. वसंत टेकडी येथील श्री नाथ विद्या मंदिर विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व विविध गुणदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी दादासाहेब भोईटे, डॉ. रेखा राणी खुराना, प्राचार्य डॉ.श्याम पंगा, डॉ. वेणु कोला, संदीप कांबळे, प्राचार्या अनुराधा चव्हाण, सविता सानप आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या'गगन भरारी' या हस्तलिखिताचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.गोटीपामुल पुढे म्हणाले, तंत्रज्ञानाच्या युगात स्पर्धा वाढली असून या स्पर्धेत टिकण्यासाठी सतत अपडेट राहणे गरजेचे आहे. मोबाइल व संगणकाचा वापर मनोरंजनापुरता न ठेवता शिक्षण, ज्ञानवृद्धी आणि प्रगतीसाठी करावा. वाचनाची आवड जोपासा. शिक्षकांचा व वडीलधाऱ्यांचा सन्मान ठेवा, पर्यावरणाचे रक्षण करा, देशाला अभिमान वाटेल असे नागरिक बना, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

### मानवी आरोग्यास घातक ठरणारा ई-कचरा योग्य ठिकाणी टाकू

मुंबई : निर्माण होणारा ई-कचरा (इलेक्ट्रॉनिक कचरा) ही गंभीर समस्या संपूर्ण जगासमोर उभी ठाकली आहे. वापरात नसलेली, खराब झालेली किंवा कालबाह्य इलेक्ट्रॉनिक उपकरणे योग्य पद्धतीने विल्हेवाट लावली गेली नाहीत तर ती माती, पाणी, हवा आणि मानवी आरोग्यासाठी घातक ठरत आहेत. यामुळे यापुढे ई-कचरा कधीही साध्या कचऱ्यात टाकणार नाही, तसेच घरी जमा झालेला ई-कचरा योग्य ठिकाणी देण्याचा संकल्प करंजी येथील श्री नवनाथ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केला.

# राहुल म्हणाले- मोदी वन मॅन शो चालवत आहेत

## २-३ अब्जाधीशांनाच याचा लाभ होतोय; खरगे म्हणाले- मोदींना गांधी आडनावाचा त्रास

दिव्य वतन /वृत्तसंस्था

नवी दिल्ली - मनरेगाचे नाव बदलून VB G RAM G करण्याला काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरून विरोध करेल. ही माहिती शनिवारी काँग्रेस कार्यसमिती (CWC) च्या बैठकीनंतर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिली. ते म्हणाले- मोदींना गांधी आडनावाचा त्रास आहे, म्हणूनच मनरेगाचे नाव बदलण्यात आले.

मनरेगाचे नाव बदलण्याचा निर्णय मंत्रिमंडळ आणि राज्यांना न विचारताच घेण्यात आला आहे. मोदींचा वन मॅन शो सुरू आहे, मोदीजींना जे करायचे आहे ते ते करतात. याचा पूर्ण फायदा 2-3 अब्जाधीशांना मिळत आहे. याचा फटका ग्रामीण भागांना बसत आहे.

राहुल म्हणाले - मनरेगा फक्त एक योजना नव्हती. मनरेगा हा हक्कांवर आधारित संकल्पना होती. म्हणजेच, यामुळे देशातील कोट्यवधी लोकांना किमान वेतन (न्यूनतम उत्पन्न) मिळत होते. मनरेगा बंद करणे हा थेट हक्कांवर आधारित संकल्पनेवर हल्ला आहे. हा जो पैसा घेतला जात आहे, तो राज्यांकडून हिसकावून केंद्र सरकार घेत आहे. हे सत्ता आणि वित्ताचे संकुचन आहे. हा निर्णय थेट पंतप्रधान कार्यालयातून घेण्यात आला आहे.

खरगे म्हणाले- SIR हा लोकशाही अधिकार कमी करण्याचा कट

दिल्लीत काँग्रेस कार्यसमिती (CWC) च्या बैठकीत खरगे यांनी हे देखील सांगितले की, मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) प्रक्रिया लोकशाही अधिकारांना कमी करण्याचा सुनियोजित कट आहे. घरोघरी जाऊन हे सुनिश्चित करा की गरीब, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्याक समुदायातील मतदारांची नावे मतदार यादीतून काढली जाऊ नयेत.

मनरेगा सोनिया गांधींच्या टीमने दिले होते. लाखो कुटुंबांना आधार दिला. मनरेगा नसते तर लाखो लोक मरण पावले असते. काँग्रेस कोणत्याही परिस्थितीत मनरेगाचे रक्षण करेल. कामगारांच्या हक्कांसाठी आम्ही संघर्ष करू. केंद्र सरकारने कोणत्याही सल्ल्याशिवाय मनरेगा रद्द केले.

मनरेगामधून राष्ट्रपिता गांधींचे नाव काढणे हा त्यांचा अपमान आहे. कारण सोनिया गांधी, मनमोहनजी यांनी मनरेगाला कायद्याचे स्वरूप दिले होते. आम्ही हक्क दिला. तुम्ही नाव बदलत आहात. तुम्हाला फक्त गांधी कुटुंबच नाही, तर महात्मा गांधींचे नावही आवडत नाही. गांधी आडनावामुळे सरकारला अडचण आहे.



हा कायदा गरिबांना चिरडण्यासाठी आणि त्यांना दाबण्यासाठी आहे. जेव्हा भारत जगातील चौथी अर्थव्यवस्था बनला आहे, त्यांच्या म्हणण्यानुसार, तर मनरेगासारखी योजना बंद का केली? तुमच्याकडे इतका पैसा आहे तर (तुम्ही) देशाला का लुटत आहात? अंबानी-अदानी देशाचा पैसा बुडवत आहेत, तर मजुरांना देण्यासाठी तुमच्याकडे पैसे नव्हते. हे सरकार श्रीमंतांसोबत राहणार आहे, हे गरिबांसोबत नाही.

काँग्रेस वर्किंग कमिटीच्या बैठकीत शशी थरूरही सहभागी झाले होते, तर ते मागील दोन मोठ्या बैठकांना अनुपस्थित होते. बिहार निवडणुकीतील पराभवानंतर CWC ची ही पहिली बैठक आहे, ज्यात कर्नाटक, तेलंगणा आणि हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री आणि PCC अध्यक्ष सहभागी झाले. बैठकीत जी राम जी बिलावर सरकारविरोधात पक्षाच्या रणनीतीवर चर्चा केली जात आहे.

बैठकीपूर्वी खरगे यांनी मनरेगाला यूपीए सरकारची दूरदृष्टीची योजना असल्याचे सांगत म्हटले की, याची जगभरात प्रशंसा झाली, याच कारणामुळे याला महात्मा गांधींचे नाव देण्यात आले. त्यांनी आरोप केला की, मोदी सरकारने कोणताही अभ्यास किंवा सल्लामसलत न करता हा कायदा रद्द केला आणि कृषी कायद्यांचे उदाहरण देत म्हटले की, जनविरोधानंतर सरकारला ते मागे घ्यावे लागले.त्यांनी बांगलादेशात हिंदू अल्पसंख्याकांवर होत असलेल्या हल्ल्यांचा निषेध केला आणि म्हटले की, भाजप-आरएसएसशी संबंधित संघटनांनी ख्रिसमस समारंभांवर केलेल्या हल्ल्यांमुळे जातीय सलोखा आणि भारताच्या जागतिक प्रतिमेला धक्का पोहोचला आहे.

## नितीन नबीन 20 जानेवारी रोजी भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष बनतील

### निवडणूक प्रक्रिया 18 जानेवारीपासून सुरू होईल, या पदावर पोहोचणारे सर्वात तरुण नेते असतील

दिव्य वतन /वृत्तसंस्था



मुंबई- नितीन कार्यकारी अध्यक्ष झाल्यामुळे भाजपमध्ये 80% तरुणांना पुढे आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तथापि, नवीन टीम तयार होण्यासाठी सुमारे 6 महिने लागतील. पण हे स्पष्ट आहे की, टीममध्ये सरचिटणीस आणि मंत्री यांसारख्या प्रमुख पदांवर बहुतेक 50 वर्षांपेक्षा कमी वयाचे लोक असतील.

पुढील वर्षी 5 राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. नितीन टीम याचनुसार तयार करतील. एका वरिष्ठ नेत्याचे म्हणणे आहे की, सहसा राष्ट्रीय अध्यक्ष कनिष्ठ किंवा समकक्षांनाच सरचिटणीस, सचिव यांसारख्या पदांवर ठेवतात.

सूत्रांनुसार, RSS 15 वर्षांनंतर भाजपमध्ये तोच प्रयोग पुन्हा यशस्वी करण्यात यशस्वी ठरले, जो त्यांनी नितीन गडकरींच्या बाबतीत केला होता. 2009 मध्ये तत्कालीन भाजप अध्यक्ष राजनाथ सिंह यांचा कार्यकाळ संपणार होता.

ज्येष्ठ नेते अरुण जेटली, सुषमा स्वराज, अनंत कुमार आणि व्यंकय्या नायडू हे सर्वात मोठे दावेदार होते. लालकृष्ण अडवाणी देखील त्यांच्या नावावर सहमत होते. पण, तेव्हा संघाने स्पष्ट केले होते की, डी-4 (दिल्ली फोर) पैकी कोणीही राजनाथ यांची जागा घेणार नाही.

मग अचानक गडकरींना अध्यक्ष बनवण्यात आले होते. तरी संघाने यावेळी कोणत्याही नावावर सार्वजनिकरित्या आक्षेप घेतला नाही. पण, ज्या प्रकारे तात्काळ प्रभावाने नितीन यांच्या नावाची घोषणा झाली, ती डी-4 ऐवजी सी-4 च्या रूपात पाहिली जात आहे.सी-4 म्हणजे केंद्रीय स्तरावरील चार समुदायांशी संबंधित नेते, जसे की महिला, ओबीसी, दलित किंवा केंद्रीय नेते. पण, यावेळीही सी-4 ला बाजूला सारून सवर्ण (कायस्थ) समुदायातील नितीन यांचे नाव आले आहे. नितीन कार्यकारी अध्यक्ष झाल्यामुळे भाजपमध्ये 80% तरुणांना पुढे आणण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तथापि, नवीन टीम तयार होण्यासाठी सुमारे 6 महिने लागतील. पण हे स्पष्ट आहे की, टीममध्ये सरचिटणीस आणि मंत्री यांसारख्या प्रमुख पदांवर बहुतेक 50 वर्षांपेक्षा कमी वयाचे लोक असतील.

पुढील वर्षी 5 राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका आहेत. नितीन टीम याचनुसार तयार करतील. एका वरिष्ठ नेत्याचे म्हणणे आहे की, सहसा राष्ट्रीय अध्यक्ष कनिष्ठ किंवा [illegible]ांनाच सरचिटणीस, सचिव [illegible]ख्या पदांवर ठेवतात.

सूत्रांनुसार, RSS 15 वर्षांनंतर भाजपमध्ये तोच प्रयोग पुन्हा यशस्वी करण्यात यशस्वी ठरले, जो त्यांनी नितीन गडकरींच्या बाबतीत केला होता. 2009 मध्ये तत्कालीन भाजप अध्यक्ष राजनाथ सिंह यांचा कार्यकाळ संपणार होता.ज्येष्ठ नेते अरुण जेटली, सुषमा स्वराज, अनंत कुमार आणि व्यंकय्या नायडू हे सर्वात मोठे दावेदार होते. लालकृष्ण अडवाणी देखील त्यांच्या नावावर सहमत होते. पण, तेव्हा संघाने स्पष्ट केले होते की, डी-4 (दिल्ली फोर) पैकी कोणीही राजनाथ यांची जागा घेणार नाही.मग अचानक गडकरींना अध्यक्ष बनवण्यात आले होते. तरी संघाने यावेळी कोणत्याही नावावर सार्वजनिकरित्या आक्षेप घेतला नाही. पण, ज्या प्रकारे तात्काळ प्रभावाने नितीन यांच्या नावाची घोषणा झाली, ती डी-4 ऐवजी सी-4 च्या रूपात पाहिली जात आहे.

## दिग्विजय यांनी मोदींचा फोटो पोस्ट केला

### नेत्यांच्या चरणांत बसणारा मुख्यमंत्री-पंतप्रधान बनला..

दिव्य वतन /वृत्तसंस्था


नवी दिल्ली -मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि राज्यसभा खासदार दिग्विजय सिंह यांनी एक्सवर पंतप्रधान मोदींचा एक फोटो पोस्ट केला. त्यात लिहिले होते-

दिग्विजय सिंह म्हणाले की, मी संघटनेचे कौतुक केले आहे. मी RSS, मोदीजी आणि त्यांच्या धोरणांचा कट्टर विरोधक आहे. मला जे काही सांगायचे होते ते मी CWC च्या बैठकीत सांगितले.

यापूर्वी दिग्विजय सिंह यांनी मध्य प्रदेश काँग्रेस कार्यालयात झालेल्या बैठकीत काँग्रेसमधील संघटना मजबूत करण्यासाठी भाजपच्या धर्तीवर काम करण्यास सांगितले आहे. यासाठी नेत्यांना बूथ आणि जमिनी स्तरावर पोहोचण्याचा संदेश दिला.

दिग्विजय म्हणाले- पंतप्रधान RSS कार्यकर्ते असतील तर सदस्यत्व फॉर्म दाखवा

माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या विधानावर पलटवार केला आहे. दिग्विजय



म्हणाले की, संघासारख्या अनरजिस्टर्ड संघटनेची हिंदू समाजाशी तुलना करून त्यांनी सनातन धर्माचा अपमान केला आहे.

अयोध्याला जाण्याच्या प्रश्नावर, माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंह म्हणाले की ते आदि शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्ताचा अभ्यास करत आहेत. अहं ब्रह्मास्मिच्या भावनेमुळे त्यांना कुठेही जाण्याची आवश्यकता नाही. 25 जानेवारी रोजी उज्जैन संस्कृत विद्यापीठात प्रवचन आयोजित केले जाईल.

काँग्रेसचे राज्यसभा खासदार दिग्विजय सिंह यांनी बांगलादेशात हिंदू आणि ख्रिश्चन समुदायासोबत होत असलेल्या हिंसाचारावर वादग्रस्त विधान केले आहे. दिग्विजय म्हणाले - बांगलादेशात जी परिस्थिती निर्माण होत आहे, त्यामागे तीच कट्टरपंथी आणि धर्मांध शक्ती आहेत, ज्या धर्माच्या नावावर राजकारण करतात.

## लालूंच्या नवीन घराची भिंत बेऊर तुरुंगापेक्षा उंच

### आजूबाजूच्या जमिनीही खरेदी करण्याची तयारी

दिव्य वतन /वृत्तसंस्था

पाटणा- लालू आणि राबडी यांच्या स्वप्नातील नवीन घर पुन्हा एकदा चर्चेत आहे. पाटण्यातील 10 सर्कुलर रोडवरील निवासस्थान जसजसे रिकामे होत आहे, तसतसे नवीन घर चर्चेत येत आहे. दीर्घकाळ बिहारची सत्ता सांभाळणारे कुटुंब पहिल्यांदाच पाटण्यात स्वतःच्या घरात जाईल.

आता प्रश्न असा आहे की, ज्या कुटुंबाकडे बिहारची सत्ता होती, ते शहराच्या झगमगाटापासून दूर घर का बांधत आहे. हे घर कसे असेल? किती खास असेल? लालू कुटुंब नवीन घरात कधी शिफ्ट होईल? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी दैनिक भास्करच्या टीमने पूर्ण तपास केला आहे.

पाटण्यातील 10 सर्कुलर रोडपासून सुमारे 5 किलोमीटर अंतरावर बनत असलेले लालू राबडी यांचे नवीन निवासस्थान वेस्टर्न स्टाईलची हवेली आहे. सर्व बाजूंनी मोठ्या खिडक्यांसह भिंती खूप जाड आहेत.

सुरक्षेचा असा आराखडा तयार केला जात आहे की, तुरुंगापेक्षाही कडक निगराणीत कुटुंबातील सदस्य सुरक्षित राहू शकतील. पाटणामधील हे पहिले असे निवासस्थान असेल ज्याची भिंत (बाउंड्री) केवळ बेऊर तुरुंगापेक्षाच नव्हे, तर देशातील अनेक मोठ्या



तुरुंगांपेक्षाही उंच आहे.

भिंतीची उंची 30 फुटांपेक्षा जास्त आहे. ही हवेली पूर्णपणे तयार झाली आहे, चारही बाजूंनी भिंतीने (बाउंड्रीने) वेढलेली आहे. सध्या फक्त रचना (स्ट्रक्चर) तयार झाली आहे, आता फिनिशिंगचे काम सुरू होत आहे.

सुमारे साडे 3 बिघा जमिनीवर बनत असलेल्या घराला आणखी मोठे करण्यासाठी लालू कुटुंब आजूबाजूच्या जमिनी घेण्याचा प्रयत्न करत आहे. भास्करच्या तपासणीत हे देखील समोर आले आहे की, लालूंच्या घराशेजारील एका जमिनीचा वापर करून घराचा परिसर आणखी वाढवण्याची तयारी आहे.

## संभाजीनगरमध्ये महायुतीत ७ जागांवर पेच कायम

### ६ तासांची मॅरेथॉन बैठक ठरली निष्फळ, आता निर्णय वरिष्ठ नेते घेणार

दिव्य वतन /वृत्तसंस्था

छत्रपती संभाजीनगर- येथे युतीच्या जागावाटपावरून सुरू असलेला पेच कायम आहे. शनिवारी सहा तास चाललेल्या बैठकीतही सात जागांवर एकमत होऊ शकले नाही. त्यामुळे आता हा प्रस्ताव महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे अंतिम निर्णयासाठी पाठवण्यात आला आहे, अशी माहिती पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिली.

केंद्रीय मंत्री भागवत कराड यांच्या निवासस्थानी महायुतीच्या नेत्यांची बैठक पार पडली. आज सकाळी 10 ते दुपारी 4 वाजेपर्यंत ही बैठक चालली. या बैठकीला भाजपकडून खासदार डॉ. भागवत कराड, ओबीसी विकास मंत्री अतुल सावे, आमदार संजय



केनेकर, आमदार रोजा चव्हाण, शहराध्यक्ष किशोर शितोळे आणि समीर राजूरकर उपस्थित होते. तर शिवसेनेकडून (शिंदे गट) पालकमंत्री संजय शिरसाट, राजेंद्र जंजाळ आणि किशनचंद तनवाणी उपस्थित होते.

पालकमंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले की, जागांबाबत दोन्ही पक्षांमध्ये चर्चा सुरू आहे आणि काही जागांवर तडजोड करण्याचा प्रयत्न केला जात आहे. दोन्ही बाजूंनी एकमेकांना प्रस्ताव दिले जात आहेत. मात्र, अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही.

दरम्यान, यापूर्वी शुक्रवारी रात्री चंद्रशेखर बावनकुळे आणि संजय शिरसाट यांच्यातही बैठक झाली होती, परंतु त्यातही कोणताही तोडगा निघाला नव्हता.

या बैठकीनंतर शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र जंजाळ यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, "शिवसेना-भाजप नैसर्गिक युतीमध्येच छत्रपती संभाजीनगर महापालिका लढवण्याचे वरिष्ठांचे आदेश होते. त्या आदेशाच्यादृष्टीने आम्ही तीन-चार बैठका केलेल्या आहेत. आज भाजप आणि शिवसेना दोन्ही पक्षांच्या संभाव्य वॉर्डांची आणि उमेदवारांच्या याद्या बनवण्यात आल्या आहेत. दोन्ही याद्या वरिष्ठांकडे पाठवल्या जातील. आज संध्याकाळपर्यंत दोन्ही पक्षांच्या वरिष्ठांकडून दोन्ही याद्यावर मंजुरी देतील आणि त्यानंतर महायुतीची एकत्रित बैठक घेऊन जागावाटप जाहीर केले जाईल."

## मनसे-शिवसेना युतीनंतर उमेदवार निश्चितीला वेग:कल्याण-डोंबिवलीत मनसेनं ५० जागांवर झेंडा रोवला, भाजप-शिवसेना युतीवरुन खदखद



दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबई- महानगर परिसरासह राज्यातील पुणे, नाशिक यांसारख्या प्रमुख महापालिकांमध्ये मनसे आणि ठाकरे गटाच्या शिवसेनेमध्ये युती जाहीर झाल्यानंतर आता निवडणुकीच्या प्रत्यक्ष रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. युती जाहीर होताच उमेदवार निश्चितीची प्रक्रिया वेगाने सुरू झाली असून, अनेक ठिकाणी एबी फॉर्म वाटप, अर्जांची तयारी आणि जागावाटपाचे अंतिम टप्पे गाठले जात आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या काही जागांवर अद्याप चर्चा सुरू असली तरी, त्याआधीच कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत मनसेने आक्रमक पवित्रा घेत थेट 50 जागांवर दावा ठोकल्याने स्थानिक राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. मनसेकडून या जागांसाठी उमेदवार निश्चित करण्यात आले असून, त्यांना अधिकृत एबी फॉर्मही पाठवण्यात आले आहेत.कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत एकूण 112 जागा आहेत. यापैकी 50 जागांवर मनसेकडून तयारी पूर्ण करण्यात आली असून, या जागांसाठी उमेदवारांची अंतिम यादी तयार झाली आहे. मनसेचे माजी आमदार राजू पाटील यांनी थेट शिवतीर्थावरून उमेदवारांचे अर्ज घेऊन रवाना होत या तयारीला अधिकृत स्वरूप दिले आहे. उर्वरित जागा या ठाकरे गटाची शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससाठी सोडण्यात आल्या आहेत. पुढील 48 तासांमध्ये कल्याण-डोंबिवलीतील मनसे उमेदवारांना एबी फॉर्मचे औपचारिक वाटप होणार असून, शेवटच्या दोन दिवसांत सर्व उमेदवार आपले अर्ज दाखल करतील, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. या हालचालींमुळे कल्याण-डोंबिवलीत निवडणुकीचा प्रचार आणि हालचालींना वेग आला आहे.दुसरीकडे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गट यांच्यात युती होणार की दोन्ही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार, याबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. युतीसंदर्भात दोन्ही पक्षांच्या समन्वयक समित्यांच्या बैठका सुरू असतानाच, भाजपच्या काही स्थानिक कार्यकर्त्यांनी थेट शिवसेनेसोबत युती नको, स्वबळावरच निवडणूक लढवावी, असा ठाम आग्रह धरला आहे. युती झालीच, तर भाजपला महापौरपदासह स्थायी समितीतील महत्त्वाची पदे मिळाली पाहिजेत, अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे. भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी कार्यकर्त्यांची ही भावना उघडपणे मांडल्याने महायुतीतील अंतर्गत मतभेद समोर आले आहेत.

भाजपकडून कल्याण-डोंबिवलीत महापौरपद आणि किमान तीन वर्षांसाठी स्थायी समिती सभापती पदाची मागणी करण्यात आली आहे. मात्र, या मागण्यांवर अंतिम निर्णय पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून घेतला जाणार असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे. नरेंद्र पवार यांनी सांगितले की, भाजपचे बहुतांश कार्यकर्ते स्वबळावर निवडणूक लढवण्याच्या भूमिकेत आहेत. युती झाल्यास अनेक इच्छुकांना उमेदवारी मिळणार नाही आणि त्यामुळे नाराजी वाढण्याची शक्यता आहे. प्रत्येक कार्यकर्ता निवडणूक लढवण्यास उत्सुक असल्याने, युतीमुळे भाजपचं नुकसान होऊ शकतं, असा दावाही त्यांनी केला आहे. युती झाली, तर बंडखोरीची शक्यता नाकारता येणार नाही आणि त्यातून अंतर्गत संघर्ष वाढू शकतो, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवलीतील राजकीय वातावरण अधिक तापत चालले आहे. एका बाजूला मनसे-शिवसेना युतीने उमेदवार निश्चितीला गती दिली असून, प्रत्यक्ष निवडणूक तयारी सुरू केली आहे.

फॅशन...

## कॉटनच्या पिंक साडीत गायत्री दातारने दाखवला लाईफ पार्टनर



मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री गायत्री दातार पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. नुकतंच तिने आपल्या इंस्टाग्राम अकाउंटवर एक व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये ती लाईट पिंक रंगाच्या कॉटन साडीत दिसत आहे. मात्र या व्हिडिओमुळे तिच्या चाहत्यांमध्ये जास्त लक्ष वेधून घेतलं कारण व्हिडिओमध्ये गायत्रीने आपला लाईफ पार्टनर, श्रीकांत याला देखील दाखवले.गायत्री दातार ही तिच्या अभिनयासोबतच आपल्या साध्या पण स्टाइलिश लूकसाठीही ओळखली जाते. ती नेहमीच आपल्या फॅशन निवडीसाठी चर्चेत राहते.या नवीन व्हिडिओमध्ये ती साध्या पण आकर्षक पिंक साडीत दिसत असून तिचा नैसर्गिक मेकअप आणि सोपी स्टाईल लक्ष वेधून घेत आहे.व्हिडिओमध्ये गायत्री आणि श्रिकांत दोघेही आनंदी दिसत आहेत. अनेक चाहते आणि फॅन्सने कॉमेंट्समध्ये लिहिलं नवऱ्याचा चेहरा एवढा लपवून ठेवल होतंस "एवढं लपवण्यासारखं काय आहे?" अशा कमेंट्स केल्या आहेत. गायत्री दातारच्या या व्हिडिओमध्ये तिचा साधा पण मोहक फॅशन स्टाइल लक्ष वेधून घेतो. पिंक रंगाच्या कॉटन साडीत ती नाजूक आणि नैसर्गिक दिसते. साडीसोबत ती नेहमीप्रमाणे हलकेसे मेकअप आणि साधे ज्वेलरी वापरली आहे, ज्यामुळे तिचा लूक आकर्षक दिसतो. पिंक रंगाच्या साड्यामुळे तिचा फेअर कॉम्प्लेक्शन अधिक उजळून दिसतो,

गायत्री दातारच्या पिंक साडीच्या पदरावर असलेले गोंडे ही साडीची खासियत आहे. हलक्या पिंक रंगाच्या कॉटन साडीवर हे गोंडे लक्षवेधी दिसतात. साडीच्या टोकालालहान, गोलसर मणकेसारखे गोंडे लावलेले आहेत, जे साडीला हलके हलतेवेळी सौंदर्यपूर्ण आणि स्टाईलिश लूक देतात. हे गोंडे केवळ पारंपरिक फॅशनचा स्पर्श देत नाहीत, तर साडीला संपूर्ण मोहक आणि आकर्षक अंदाज देतात.

गायत्री दातारच्या पिंक साडीतील मेकअप अत्यंत साधा आणि नैसर्गिक होता, ज्यामुळे तिच्या सौंदर्यावर अधिक भर पडत होता. हलक्या पिंक टोनच्या साडीसोबत हलका फाउंडेशन, सूक्ष्म आयशॅडो आणि आयलाइनर वापरून तिचे डोळे नैसर्गिक पण आकर्षक दिसत होते. गालावर हलका ब्लश आणि ओठांसाठी सौम्य पिंक लिपस्टिक निवडल्यामुळे चेहरा एकंदर मोहक आणि ताजेतवाने दिसत होता. जड मेकअप न करता साधेपणात हा लूक साडीच्या सौंदर्याला अधोरेखित करतो आणि फॅन्सलाही खूप आवडला.

गायत्री दातारच्या पिंक साडीच्या लूकसाठी तिची हेअरस्टाईल साधी पण आकर्षक होती. तिने केस मोकळे सोडलेले होते, जे नैसर्गिक आणि हळुवार अंदाज देत होते. केसांच्या हलक्या वाळवंटातल्या लाटा साडीच्या सौंदर्याशी सुसंगत होत्या आणि संपूर्ण लूक अधिक मोहक दिसत होता. कोणतेही जड हेअर ॲक्सेसरीज वापरल्या न गेल्यामुळे फोकस साडी आणि तिच्या नैसर्गिक सौंदर्यावर राहिला.

## तेजस्विनी लोणारी व समाधान सरवणकरांचे हनिमूनचे फोटो व्हायरल



मराठी मनोरंजन क्षेत्रात आपल्या गोड हास्याने आणि मोहक व्यक्तिमत्त्वाने प्रेक्षकांची मने जिंकणाऱ्या कलाकारांमध्ये तेजस्विनी लोणारीचे नाव सर्वांत पुढे येते. तिचा फॅशन सेन्स आणि स्क्रीनवरील दमदार उपस्थिती यामुळे ती नेहमी चर्चेत राहते. नुकताच तिचा विवाह सोहळा अत्यंत सुंदर वातावरणात पार पडला. लग्नानंतर हे नवदांपत्य हनिमूनसाठी परदेशात रवाना झाले असून, तिथून शेअर केलेले त्यांचे काही खास क्षण सध्या सोशल मीडियावर दणका देत आहेत.तेजस्विनीच्या ग्लॅमरस स्टायलिंगमुळे आणि समाधानसोबत टिपलेल्या तिच्या खुल्या, आनंदी क्षणांमुळे हे फोटो वेगाने व्हायरल झाले आहेत. लंडनच्या आल्हाददायक वातावरणात घेतलेले हे चित्र पाहून चाहत्यांना जणू त्यांच्या आनंदयात्रेची झलक प्रत्यक्ष अनुभवत असल्यासारखे वाटत आहे. लंडन ही सेलिब्रिटी कपल्ससाठी नेहमीच 'ड्रीम हनिमून' डेस्टिनेशन मानली जाते. तेजस्विनी व समाधान यांनीही हा सुंदर प्रवास निवडला. लंडनच्या अप्रतिम व्ह्यूजमध्ये, शहराच्या चमचमता दिव्यांमध्ये आणि ऐतिहासिक ठिकाणांच्या पार्श्वभूमीवर काढलेले त्यांच्या फोटोंनी सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. विशेष म्हणजे, तेजस्विनीचे वेस्टर्न वियरमधले ग्लॅमरस लूक नेटिझन्सचे लक्ष वेधून घेत आहेत. तिच्या इंस्टाग्रामवर पोस्ट केलेल्या प्रत्येक फोटोला काही मिनिटांतच हजारो लाइक्स आणि कमेंट्स मिळत आहेत. लंडनच्या थंडगार वातावरणात तेजस्विनीचा वेस्टर्न लूक प्रेक्षकांना अक्षरशः वेड लावत आहे. तिच्या हनिमून फोटोंमध्ये तिची स्टाईलिंग सेन्स आणि फॅशनची समज स्पष्ट दिसून येते. तिने निवडलेले आउटफिट्स साधे असूनही कमालीचे एलीगंट आणि ग्लॅमरस आहेत.कधी तिने न्यूड आणि पेस्टल टोनचे कोट्स परिधान केले, तर कधी हाय नेक स्वेटर्स आणि लाँग बूट्स मध्ये ती खूपच हटके दिसत होती. तिचे हे लुक चाहत्यांना देखील खूप आवडले आहेत. तेजस्विनीच्या हनिमून फोटोंमध्ये सर्वाधिक चर्चेत राहिलेली गोष्ट म्हणजे तिचा सिंपल आणि नेचरल मेकअप लूक. सेलिब्रिटी म्हणजे नेहमीच हाई-ग्लॅम लूकमध्ये दिसतात, पण तेजस्विनीने यावेळी अगदी उलट मार्ग निवडला. तिने 'मिनिमल इज मोअर' हा फॅशन मंत्र जणू परफेक्टरीत्या जपला आहे.तिच्या चेहऱ्यावर हलकासा नॅचरल बेस, थोडा रोझ टोन ब्लश, हलका हायलाइटर, आणि ओठांवर न्यूड शेडचा ग्लॉस हे सर्व वापरून तिने हा लुक पूर्ण केला आहे.

तेजस्विनीच्या हनिमून लूकमध्ये सर्वाधिक लक्ष वेधणारा एक छोटासा पण प्रभावी फॅशन एलिमेंट म्हणजे तिचा ॲनिमल प्रिंट स्कार्फ. साधा पोशाख असो किंवा एलीगंट कोट या स्कार्फने तिच्या संपूर्ण लूकला एकदम क्लासी आणि मॉडर्न टच दिला आहे.तिने हा स्कार्फ कधी लाँग ओव्हरकोटवर ड्रीप केला.





# सलमान खानचे चाहत्यांना बर्थडे सरप्राइज!

## अंगावर काटा आणणारा 'बॅटल ऑफ गलवान'चा टीजर रीलिज

सलमान खानच्या 60 व्या वाढदिवशी त्याच्या चाहत्यांना खास सरप्राइज मिळाले आहे. अभिनेत्याच्या बहुप्रतिक्षित 'बॅटल ऑफ गलवान' या सिनेमाचा टीजर प्रेक्षकांच्या भेटीला आला, ज्यात प्रेक्षकांच्या लाडक्या 'भाईजान'चा वेगळा लूक पाहायला मिळतो आहे. या चित्रपटात सलमानने कर्नल बी. संतोष बाबू यांची भूमिका साकारली आहे. 2020 मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या भारत-चीन संघर्षात ते शहीद झाले होते. ते 16 बिहार रेजिमेंटचे कमांडिंग ऑफिसर होते असून त्यांना मरणोत्तर देशाचा दुसरा सर्वोच्च शौर्य पुरस्कार असणारे महावीर चक्र प्रदान करण्यात आलेले.

Battle Of Galwan हा चित्रपट अपूर्व लाखिया यांनी दिग्दर्शित केला असून सलमानसह अभिनेत्री चित्रांगदा सिंह यामध्ये मुख्य भूमिकेत आहे. देशभक्तीची भावना या टीझरमध्ये पाहायला मिळाली. तसेच टीजरमध्ये 'मेरा भारत देश महान है' हे गाणेही ऐकू येते, जे अंगावर काटा आणणारे ठरते.

'बॅटल ऑफ गलवान'चा टीजर सलमान खानच्या तोंडी असणाऱ्या संवादांमुळेही चर्चेत राहील असा आहे. टीजरची सुरुवातच सलमानच्या एका प्रोत्साहित करणाऱ्या संवादाने होते. कर्नल बी. संतोष बाबू यांच्या भूमिकेत असणारा सलमान इतर सैनिकांना म्हणतो, 'सैनिकांनो, लक्षात ठेवा, जर तुम्ही जखमी झालात तर ते पदक समजा आणि जर तुम्हाला मृत्यू दिसला तर सलाम करा आणि म्हणा... बिरसा मुंडा की जय, बजरंग बली की जय. भारत माता की जय!'

टीजरमध्ये एक दृश्य दाखवले जाते ज्यामध्ये सलमानच्या हातात केवळ एक जाड लाकूड आहे आणि इतर सैनिकही साथीला आहेत. समोरुन शत्रू सैन्याची मोठी तुकडी या मोजक्या भारतीय सैनिकांवर हल्ला करते. देशासाठी काहीही करण्याची जिद्द असणारे हे जवान शत्रूचा सामना करतात. त्यावेळी सलमानचा आणखी एक संवाद ऐकू येतो, 'मरणाला का घाबरायचं? ते कधीतरी येणारच आहे.'

सलमान दीर्घकाळानंतर एका वेगळ्या भूमिकेत दिसणार असून, त्याचे चाहते टीजर पाहूनच आनंदी झाले आहेत. त्याची





ही भूमिका नेहमीच्या पात्रांपेक्षा वेगळी वाटते आहे आणि तो बॉक्स ऑफिसवर कमाल करेल हे, हे पाहण्यासाठीही चाहते उत्सुक आहेत. सलमानचा हा चित्रपट 17 एप्रिल 2026 रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे संगीत हिमेश रेशमियाचे असून यामध्ये अनेक नवीन कलाकारांचाही समावेश आहे.

## मातृभाषेत पहिल्यांदाच सिनेमा करताना भारावली प्राजक्ता कोळी

### 'माझं स्वप्न अखेर पूर्ण झालं'

कल्पेशराज कुबल, उपमा सिंग, मुंबईः कोणत्याही भूमिकेत सहजपणे वावरणं ही अभिनेत्री Prajakta Koli हिची जमेची बाजू. म्हणूनच तिनं साकारलेल्या भूमिका प्रेक्षकांच्या लक्षात राहतात. युट्यूबर ते अभिनेत्री हा तिचा प्रवास फार रंजक आहे. 'जुग जुग जियो', 'नियत' हे सिनेमे असोत किंवा 'मिसमॅच्ड', 'जिंदगीनामा' 'अंधेरा', 'सिंगल पापा' अशा वेब सीरिज असो; प्रत्येक कलाकृतीत तिनं स्वतःची वेगळी छाप सोडली. आता आगामी 'क्रांतिज्योती विद्यालयः मराठी माध्यम' या सिनेमाच्या निमित्तानं ती मराठी सिनेमात पदार्पण करणार आहे. यानिमित्तानं तिच्याशी संवाद साधला असता, ती वेगवेगळ्या विषयांवर व्यक्त झाली.

हेमंत-क्षितीसोबत काम करायचं होतं

'फर्स्टक्लास दाभाडे' च्या स्क्रीनिंगनंतर मी क्षिती जोग आणि हेमंत ढोमे यांना सांगितलं होतं की, कुठल्याही सिनेमासाठी माझ्यासाठी काही असेल, तर नक्की सांगा. दोघांनी हे लक्षात ठेवून मला 'क्रांतिज्योती विद्यालयः मराठी माध्यम' या सिनेमासाठी विचारलं. भूमिका, कथा काय हेही मला माहीत नव्हतं. पण त्या दोघांसोबत मला काम करायची इच्छा असल्यामुळे मी लगेचच होकार दिला.

12 वर्षांपूर्वी मी कॉलेजमध्ये असताना मराठी नाटकात काम करत होते. रेडिओमध्ये काम सुरू केल्यानंतर ते सगळं थांबवलं. तरीही, कधीतरी मी मराठी सिनेमा करावा ही इच्छा कायमच मनात होती. नववर्षात पहिल्याच दिवशी हेमंत ढोमे लिखित आणि दिग्दर्शित 'क्रांतिज्योती विद्यालय मराठी माध्यम' हा माझा पहिला मराठी सिनेमा प्रदर्शित होणार आहे. एक स्वप्न पूर्ण झालंय.

मी शाळेत असताना फार अभ्यासू नव्हते, पण भाषा आवडायच्या. शालेय जीवनातील माझ्या आठवणी वर्गातल्या कमी आणि शाळेबाहेरच्या जास्त आहेत. शाळा सुटल्यावर बाहेर उभं राहून गप्पा मारणं, वडापाव किंवा चणेवाल्याजवळ वेळ घालवणं... तिथेच मैत्री जुळणं आणि पहिल्यांदा कोणीतरी आवडल्याचं सांगणं या आठवणी खूप खास आहेत. 'क्रांतिज्योती विद्यालय...'ची संहिता वाचताना त्या आठवणी पुन्हा जिवंत झाल्या होत्या.

मराठी सिनेमा अधिकाधिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचा असेल, तर सोशल मीडियाचा प्रभावीपणे वापर करता येऊ शकतो. माझ्या पोस्ट्सवर अनेक अमराठी प्रेक्षकांच्या 'तुझा सिनेमा डब होणार का', 'सबटायटल्स असतील का' अशादेखील प्रतिक्रिया आल्या आहेत. प्रादेशिक सिनेमा आता केवळ त्या भाषेपुरता मर्यादित राहिलेला नाही. आज भारत हा जगातील मोठ्या डिजिटल इकॉनॉमीपैकी एक आहे. 'ओटीटी'मुळे विविध भाषांमधील कन्टेंट देशभर 'क्रॉस-पॉलिनेट' होत आहे. आजचा प्रेक्षक जाणीवपूर्वक आपला वेळ आणि पैसा खर्च करतो. त्यामुळे प्रेक्षकांना दर्देदार कन्टेंट देत राहणं हाच मराठी सिनेमासाठी पुढे जाण्याचा एकप्रकारे योग्य मार्ग आहे.

सगळ्या शिक्षकांना 'थँक्स'

ठाण्यातील वसंत विहार हायस्कूलमध्ये माझं नर्सरीपासून दहावीपर्यंतचं शिक्षण झालं. माझ्या नर्सरीच्या शिक्षिका मालिनी मॅडम माझ्यासाठी खास आहेत. दहावीच्या शेवटच्या दिवसापर्यंत मी त्यांना दर आठवड्याला भेटायला जायचे, मनातलं सगळं त्यांच्याशी शेअरही करायचे. मी भाषांमध्ये उत्तम होते, गणित आणि विज्ञान कठीण जायचं. त्यावेळी अनिल सरांनी माझा अभ्यास घेतला. आनंद सरांनी मला पहिल्यांदा वक्तृत्व स्पर्धेत व्यासपीठावर उभं केलं आणि रोज सकाळी शाळेच्या सभागृहात बातमीवाचनाची जबाबदारी दिली. तिथेच माइक आणि रंगमंचाशी माझी ओळख झाली.'मिसमॅच्ड', 'जुग जुग जियो' आणि 'सिंगल पापा' या तिन्ही कलाकृतींमध्ये मी लग्नाच्या तयारीत असलेल्या नवरीच्या भूमिकेत दिसले. तर याच वर्षी खऱ्या आयुष्यात वृषांक खलान याच्याशी माझं लग्न झालं. त्यामुळे वारंवार लग्नाचा लेहंगा परिधान करण्याचा अनुभव खास ठरला. लेहंगा परिधान करून तयार होण्यात मजा येते. पण 'सिंगल पापा' या वेब सीरिजच्या चित्रीकरणा दरम्यान परिस्थिती थोडी वेगळी होती. या सीरिजचं चित्रीकरण आम्ही रणथंबोरमध्ये मे महिन्यात तब्बल 48 अंश सेल्सिअस तापमानात केलंय. लेहंगा सुंदर होता; पण जडही होता. त्यामुळे तिथल्या तापमानात तो परिधान करून चित्रीकरण करणं थकवणारं होतं.

## रोमँटिक कविता अन् प्रेमाची भाषा, नंदिनीचं मन जिंकण्यासाठी जीवाची धडपड

मालिकेच्या 27 December 2025 च्या भागाच्या सुरुवातीला असे दाखवले की, नंदिनी जीवाच्या आठवणीत रममाण झाळेली असते. ती जीवाचं सोशल मीडिया प्रोफाइल उघडून त्यातील फोटो बघत असते आणि तेव्हा चुकून तिच्याकडून त्यांचा एक फोटो लाइक होतो. तिच्या लक्षात येतं की, तिने गडबडीत हा फोटो लाइक केला आणि हे नोटिफिकेशन जीवाच्या फोनवर जातं. जीवाचा आनंद गगनात मावेनासा होतो. नंदिनी अजूनही त्यांच्या नात्याबद्दल विचार करतेय, या विचारानेच तो नाचू लागतो. तो त्यांच्या खोलीतील भींतीवर नंदिनीचे फोटो लावून घेतो. तिच्या फोटोसोबत डान्स करतो, फोटोलाच मिठीत घेतो आणि त्यासोबत गप्पाही मारतो. जीवा फोटोकडे पाहून म्हणतो की, 'तू इतकं जरी केलंस तरी मी जीवंत राहीन.' तो तिला त्यांची खास कविता मेसेज करतो.



दुसरीकडे नंदिनी फोटो लाइक झाला म्हणून चिडून जीवाला सोशल मीडियावरुन ब्लॉक करते. तेव्हा जीवा तिला थेट फोनच करतो. नंदिनी आधी त्याच्यावर वैतागते. जीवा तिला फोटो लाइक करण्याविषयी विचारतो. नंदिनीशी तो प्रेमाने बोलण्याचा प्रयत्न करतो, मात्र ती त्याचा अपमान करते. नंदिनी म्हणते की, तिने चुकून तो फोटो लाइक केला. त्यावर जीवा म्हणतो की, अशा चूका होत राहू दे. जीवा म्हणतो की, तिला त्याची आठवण येत असेल आणि म्हणूनच तिने फोटो लाइक केला. जीवा फोनवरच त्या दोघांची कविताही ऐकवतो, तिचं अजूनही प्रेम असल्याचं म्हणतो. नंदिनी भावुक होते, पण ती प्रेमाने बोलत नाही आणि फोन ठेवून देते. जीवा मनाशी ठरवतो की, तो असं काहीतरी करेल की नंदिनी त्याच्यावरचं प्रेम पुन्हा व्यक्त करेल. 'लग्नानंतर होईलच प्रेम'मध्ये पुढे असे दाखवले की, मानिनीला तिच्या दोन्ही सुनांची आठवण येत असते. तिला स्वयंपाक घरातील तिघींचे क्षण आठवतात. त्यावेळी विक्रम येऊन तिची समजूत घालतो. त्याला समजतं की, मानिनी आणि नंदिनी-काव्या यांची या किचनमध्येच मैत्री झाली होती. मानिनी त्या दोघींच्या आठवणी विक्रमला सांगते. मानिनी इच्छा व्यक्त करते की, तिच्या दोन्ही सुना घरी परत यायला हव्या आहेत. विक्रम तिची समजूत घालतो आणि तिला सांगतो की, त्या दोघी नक्की परत येणार. विक्रम पुढे म्हणतो की, जीवा नंदिनीमध्ये आणि काव्या पार्थमध्ये गुंतले आहेत. शिवाय नंदिनी-पार्थच्या डोळ्यातही प्रेम दिसतं. तो म्हणतो की, त्यांचं बिनसलेलं नातं ठीक व्हायला वेळ जाईल. मानिनी म्हणते की, 'संसाराचं सुख-दुःखाचं चक्र असतं आणि ते फिरत राहतं. सुरुवातीला जीवा-काव्या जिथे होते, तिथे आता नंदिनी-पार्थ आहेत.' दोघेही विश्वास व्यक्त करतात त्यांचे दोन्ही लेक आणि सुनांचा संसार व्यवस्थित होईल. विक्रम सांगतो की, मुलींनी घर सोडलं असलं तरी त्या इथल्या माणसांची काळजी करतायंत. विक्रम मानिनीला नंदिनीचा मेसेज दाखवतो, ज्यात तिने औषधे वेळेत घेण्याचा सल्ला दिला आहे. तर काव्याचा फोन आल्याचेही तो सांगतो. काव्याने पार्थसाठी काहीतरी गिफ्ट पाठवलं आहे, हे सांगण्यासाठी तिने सासऱ्यांना फोन केला होता.

शिवाय देशमुखांच्या घरात वसुंधरा आणि रम्या अजूनही आनंद साजरा करत असतात. नाश्त्याला खास बर्गर आणि फ्राइज मागवून त्या पार्थ-जीवाचा संसार मोडल्याचा आनंद साजरा करतात. पार्थने रम्यासोबत पहाटे चालण्यासाठी आलेला, यावरुन रम्या हुरळून जाते. शिवाय ती वसुंधराला सांगते की, तिने पार्थसमोर हात दुखत असल्याचं नाटक केलं आणि तेव्हा पार्थने तिला काही हाताचे व्यायामही दाखवले. पार्थचं आपुलकीने वागणं तिला प्रेमात बदलायचं असतं. वसुंधरा ठरवते की, वर्षाच्या शेवटी पार्थ-नंदिनी आणि जीवा-काव्याचं नातं संपलं आणि आता नवीन वर्षाच्या सुरुवातीला पार्थ-रम्याचं नातं जुळवायचं. या कटात जर काव्या मध्ये मध्ये आली, तर तिला कसं बाजूला करायचं याचाही त्या विचार करतात.

## अल्लू अर्जुनविरुद्ध चार्जशीट दाखल:पोलिसांनी अभिनेत्यासह २३ लोकांना पुष्पा-२ च्या स्क्रीनिंगमध्ये झालेल्या चेंगराचेंगरीसाठी दोषी मानले

तेलंगणा पोलिसांनी अभिनेता अल्लू अर्जुनसह 23 जणांना गर्दीला कारणीभूत ठरवले आहे. 100 पानांचे आरोपपत्र नंपल्ली न्यायालयात दाखल करून म्हटले आहे की, व्यवस्थापनाच्या अभावामुळे गर्दी झाली होती.

गेल्या वर्षी 4 डिसेंबर 2024 रोजी हैदराबादमधील आरटीसी क्रॉस रोडवरील संध्या थिएटरमध्ये पुष्पा 2: द रूलच्या प्रीमियर स्क्रीनिंगदरम्यान चेंगराचेंगरी झाली होती. यात रेवती नावाच्या महिलेचा मृत्यू झाला होता. तिचा 8 वर्षांचा मुलगा श्रीतेज गंभीर जखमी झाला होता.

100 पानांच्या आरोपपत्रातील 4 मुद्दे

थिएटर व्यवस्थापनाला मुख्य आरोपी ठरवण्यात आले, कारण स्वतंत्र प्रवेश-निर्गमन नसणे आणि गर्दी नियंत्रणाचा अभाव होता.

अल्लू अर्जुन आरोपी क्रमांक 11 आहेत, त्यांच्यासोबत त्यांचे खासगी सुरक्षा कर्मचारी, व्यवस्थापक, 3 व्यवस्थापक आणि 8 बाउन्सर यांचा समावेश आहे.

भारतीय न्याय संहिता (BNS) च्या कलम 105, 118(1), 304-A (निष्काळजीपणामुळे मृत्यू) आणि सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण केल्याचे आरोप लावण्यात आले.

चिक्कडपल्ली एसीपी रमेश कुमार यांनी तपास केला होता, त्यांनी सांगितले की पोलिसांनी अर्जुनचे व्यवस्थापक संतोष यांना परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याची माहिती दिली होती.

चेंगराचेंगरीच्या ९व्या दिवशी अल्लू अर्जुनला अटक झाली होती.

अल्लू अर्जुनला चेंगराचेंगरीच्या ९व्या दिवशी १३ डिसेंबर रोजी अटक करण्यात आली होती. १४ डिसेंबर रोजी तेलंगणा उच्च न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला होता.

31 डिसेंबर रोजी पोलिसांनी अल्लूची 3 तास चौकशी केली.

जामीन मिळाल्यानंतर, 31 डिसेंबर रोजी अल्लू अर्जुनची 3 तासांपेक्षा जास्त वेळ चौकशी करण्यात आली. अल्लू सकाळी 11 वाजता चिक्कडपल्ली पोलिस ठाण्यात पोहोचले होते. त्यांची दुपारी 2.45 वाजेपर्यंत चौकशी सुरू होती. हैदराबाद सेंट्रल झोन डीसीपींच्या नेतृत्वाखालील पथकाने अभिनेत्याला प्रश्न विचारले.

अहवालानुसार, अल्लू अर्जुनला विचारण्यात आले होते की तो घटनास्थळी उपस्थित होता का. त्याने परिस्थिती कशी हाताळली? यावर तो म्हणाला- मला महिलेच्या मृत्यूची माहिती दुसऱ्या दिवशी मिळाली.

सुटकेनंतर पत्रकार परिषद घेतली होती.

सुटकेनंतर अल्लू अर्जुनने पत्रकार परिषद घेऊन सांगितले, 'हा सर्व एक अपघात होता. मी कुटुंबासोबत चित्रपटगृहात चित्रपट पाहण्यासाठी गेलो होतो. ही घटना बाहेर घडली आहे. या घटनेचा माझ्याशी थेट संबंध नाही. मी पूर्णपणे त्या महिलेच्या कुटुंबासोबत आहे, ज्या पद्धतीने शक्य होईल मी त्यांना मदत करेन.' अल्लू अर्जुन पुढे म्हणाला, 'मी त्या चित्रपटगृहात गेल्या 20 वर्षांपासून 30 पेक्षा जास्त वेळा गेलो आहे. पण असे आजपर्यंत कधीही घडले नाही. हे पूर्णपणे दुर्दैवाने घडले आहे. या घटनेबद्दल मला खूप वाईट वाटते.'



पुष्पा-2 टीमने पीडित कुटुंबाला ₹2 कोटी दिले.

हैदराबादमध्ये पुष्पा-2 च्या स्क्रीनिंगदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत जीव गमावलेल्या महिलेच्या कुटुंबाला पुष्पा चित्रपटाच्या टीमने 2 कोटी रुपयांची मदत केली आहे.

अल्लू अर्जुनच्या वडिलांनी माहिती दिली होती की, अल्लू अर्जुनने 1 कोटी रुपये दिले आहेत, तर पुष्पाचे दिग्दर्शक सुकुमार आणि मैत्रेयी प्रोडक्शन हाऊसने प्रत्येकी 50-50 लाख रुपये दिले आहेत.

पुष्पा-2 ब्लॉकबस्टर ठरली होती.

पुष्पा-2 कमाईच्या बाबतीत ब्लॉकबस्टर ठरली होती. रिपोर्ट्सनुसार, सुमारे 400 कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनलेल्या या चित्रपटाने जगभरात सुमारे 1600 कोटी रुपये कमावले होते.

## अर्थविश्व...

### तुमचा पैसा- घर खरेदी करावे की भाड्याने राहावे:काय आहे जास्त फायदेशीर, तज्ञांकडून जाणून घ्या दोघांचे फायदे आणि तोटे, निवड कशी करावी



प्रत्येकाचं स्वप्न असतं की आपलं स्वतःचं एक घर असावं. घराशी आपलं एक भावनिक नातं असतं. मात्र, आजच्या सतत वाढत्या महागाईत सर्वात मोठा प्रश्न हा आहे की घर विकत घेणं योग्य आहे की भाड्याने राहणं जास्त चांगलं आहे?जर घर विकत घ्यायचं असेल, तर काही डाउन पेमेंट आणि EMI भरल्यानंतर तुम्ही घराचे मालक होऊ शकता. आपण त्यात शांतपणे राहू शकतो. तिथे आपल्या पद्धतीने जगू शकतो.दुसरीकडे, भाड्याने राहणंही सोपं वाटतं, कारण यात एकरकमी मोठी रक्कम लागत नाही आणि गरज पडल्यास जागा बदलणंही सोपं होतं.अशा परिस्थितीत दोन्ही पर्यायांमध्ये योग्य निवड करणं कठीण होतं, कारण यात आपली कमाई, बचत, जीवनशैली, कुटुंबाच्या गरजा आणि भविष्यातील नियोजन हे सर्व जोडलेलं असतं.

म्हणूनच, आज तुमच्या पैसा या कॉलममध्ये आपण जाणून घेऊया की घर विकत घेणं योग्य आहे की भाड्याने राहणं. त्याचबरोबर हे देखील जाणून घेऊया की-

घर विकत घेण्याचे फायदे आणि तोटे काय आहेत?

तुमच्या उत्पन्न आणि गरजांनुसार कोणता पर्याय योग्य आहे?

प्रश्न- वाढत्या महागाईत घर खरेदी करणे शहाणपणाचे आहे की चुकीचा निर्णय?

उत्तर- सध्याच्या काळात वाढती महागाई आणि रिअल इस्टेटच्या वाढलेल्या किमतींमुळे घर खरेदी करणे सोपे काम नाही. एकरकमी डाउन पेमेंट आणि दीर्घकाळ ईएमआयच्या दबावामुळे कोणाचेही बजेट बिघडू शकते.

तथापि, दुसरी बाजू अशी आहे की, जर आपले उत्पन्न स्थिर असेल आणि दीर्घकाळ एकाच शहरात राहायचे असेल, तर घर खरेदी करणे शहाणपणाचा व्यवहार ठरू शकतो. ज्यांचे उत्पन्न अजून सुरुवातीच्या टप्प्यावर आहे किंवा ज्यांची नोकरीत वारंवार बदली होते, त्यांच्यासाठी हे ओझे ठरू शकते.

प्रश्न- करात सूट हवी असेल तर घर खरेदी करणे चांगले आहे की भाड्याने राहणे?

उत्तर- घर खरेदी केल्यावर करात थेट कोणतीही सूट मिळत नाही. तथापि, गृहकर्जाच्या EMI मध्ये व्याज आणि मूळ रक्कम या दोन्हीवर करात सूट मिळते. यामुळे दीर्घकाळ कर बचत होत राहते.तर, दुसरीकडे भाड्याने राहत असताना HRA म्हणजेच घरभाडे भत्ता (House Rent Allowance) क्लेम करता येतो. यात मर्यादित कर लाभ मिळू शकतात.त्यामुळे जर करात सूट हवी असेल, तर घर खरेदी करणे अधिक चांगला पर्याय असू शकतो.

प्रश्न- घर खरेदी करण्याचे काही तोटे देखील असू शकतात का?

उत्तर- घर खरेदी केल्याने थेट कोणतेही नुकसान होत नाही. तुम्ही कधी आणि कुठे घर खरेदी करत आहात यावर ते तुमच्या परिस्थितीवर अवलंबून असते. यामुळे कोणत्या प्रकारचे नुकसान होऊ शकते

### 4 दिवसांत कंपनीला मिळाले 3 प्रोजेक्ट, बाजारात शेअरचा कमबॅक, स्टॉकची किंमत 100 रुपये



मुंबई: विक्रन इंजिनिअरिंग लिमिटेडच्या शेअरवर गुंतवणूकदारांचे वर्षाच्या शेवटच्या आठवड्यातही लक्ष असणार आहे. या कंपनीला अवघ्या 4 दिवसांमध्ये तब्बल 1000 मेगावॅटपेक्षा जास्त क्षमतेचे सोलर वर्क प्रोजेक्ट्स मिळाले आहेत. दोन दिवसांमध्ये गुंतवणूकदारांनी या शेअरची मोठ्या प्रमाणात खरेदी केली आहे. या दरम्यान 16 टक्क्यांनी कंपनीच्या शेअरचा भाव वधारला आहे. शुक्रवार, 26 डिसेंबर रोजी कंपनीच्या शेअरची किंमत बीएसईमध्ये 4.40 टक्क्यांनी वाढून 100.75 रुपये झाली. गेल्या दोन दिवसांत कंपनीच्या शेअरमध्ये 16 टक्क्यांची वाढ दिसून आली आहे.26 डिसेंबरला एक्सचेंजला कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, कंपनीला मध्य प्रदेशातून 45.75 मेगावॅटचा सोलर प्रोजेक्ट मिळाला आहे. हा प्रोजेक्ट विदिशा जिल्ह्यात राबवला जाईल. हा प्रोजेक्ट एमपी ऊर्जा विकास निगम लिमिटेडकडून मिळाला आहे. याआधी, 25 डिसेंबर रोजी कंपनीला एनटीपीसी रिन्यूएबल एनर्जी लिमिटेडकडून 400 मेगावॅटचा प्रोजेक्ट मिळाला होता. या वर्क ऑर्डरची किंमत 459.20 कोटी रुपये आहे. हा प्रोजेक्ट उत्तर प्रदेशातील चित्रकूट येथे केला जाईल.

### भारतात 166 हजार कोटींची गुंतवणूक करणार! मित्र देशाच्या PM कडून आपल्याच मंत्र्याचा विरोध डावलत Trade Deal



भारतासाठी एक आनंदाची बातमी आली आहे, न्यूझीलंडचे पंतप्रधान क्रिस्टोफर लक्सन यांनी भारतासोबत एक ऐतिहासिक मुक्त व्यापार करार (FTA) केला आहे. पंतप्रधान लक्सन यांनी म्हटले की, या करारामुळे दोन्ही देशांमध्ये आर्थिक सहकार्य वाढेल आणि भविष्यासाठी नवीन संधी निर्माण करेल, ज्यामुळे न्यूझीलंडमध्ये रोजगाराच्या नवीन संधी, उत्पन्नात वाढ आणि निर्यातीत वाढ होईल. मात्र, न्यूझीलंडचे परराष्ट्र मंत्री विंस्टन पीटर्स यांनी या करारावर टीका केली आहे, कारण त्यांच्या मते हा करार मुक्त किंवा निष्पक्ष नाही आणि न्यूझीलंडसाठी योग्य नाही, विशेषतः डेअरी उत्पादनांसारख्या काही देशांतर्गत क्षेत्रांना पुरेशी सुरक्षा मिळालेली नाही. यावर पंतप्रधान लक्सन यांनी या कराराला एक मोठे आर्थिक पाऊल म्हटले आहे, ज्यामुळे न्यूझीलंडला 140 कोटींहून अधिक भारतीय ग्राहकांच्या विशाल बाजारपेठेत प्रवेश मिळेल.

सर्वात वेगाने पूर्ण झालेला व्यापार करार

पंतप्रधान लक्सन यांनी एक्स वर लिहिले की, हा ऐतिहासिक करार अधिक नोकऱ्या, चांगले उत्पन्न आणि निर्यातीसाठी नवीन संधी घेऊन येईल. ते म्हणाले की आम्ही मूलभूत समस्या सोडवत आहोत आणि भविष्याचे निर्माण करत आहोत. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील या FTA वर डिसेंबर 2025 मध्ये चर्चा पूर्ण झाली. याला भारताच्या सर्वात वेगाने पूर्ण झालेल्या व्यापार करारांपैकी एक मानले जात आहे. अधिकृत चर्चेला याच वर्षी मार्चमध्ये सुरुवात झाली, जेव्हा पंतप्रधान लक्सन भारतात आले होते.या करारामुळे भारताला न्यूझीलंडमधील सर्व निर्यातींवर शुल्कमुक्त सुविधा मिळेल. यामुळे भारताच्या अनेक प्रमुख क्षेत्रांना, विशेषतः वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, अभियांत्रिकी उत्पादने आणि सेवा क्षेत्राला नवीन संधी मिळण्याची अपेक्षा आहे. भारतीय कंपन्यांसाठी न्यूझीलंडची बाजारपेठ पूर्वीपेक्षा अधिक सुलभ होईल.

# पाकिस्तानकडून पराभव झाला तरी बीसीसीआयने आयुष म्हात्रेकडे दिली सर्वात मोठी जबाबदारी

नवी दिल्ली : १९ वर्षांखालील आशिया कप स्पर्धेच्या फायनलमध्ये भारताला पाकिस्तानकडून लाजीरवाणा पराभव पत्करावा लागला होता. यावेळी भारताचा कर्णधार होता तो आयुष म्हात्रे. पण या मानहानीकारक पराभवानंतरही बीसीसीआयने आयुषवर आपला विश्वास कायम दाखवला आहे. कारण आता बीसीसीआयने त्याला सर्वात मोठी जबाबदारी दिली आहे. त्याचबरोबर वैभव सूर्यवंशीबरोबरही बीसीसीआयने न्याय केला असून त्याच्यावरही विश्वास दाखवला आहे.

आयुष म्हात्रे हा भारताच्या १९ वर्षांखालील संघाचे गेल्या काही दिवसांपासून नेतृत्व करत आहे. आयुषच्या नेतृत्वाखाली भारताने आतापर्यंत चांगली कामगिरी केली आहे, पण आयुष म्हात्रेला मात्र आतापर्यंत आपली छाप पाडता आलेली नाही. काही दिवसांपूर्वी १९ वर्षांखालील झालेल्या आशिया कप स्पर्धेत आयुषच्या नेतृत्वाखाली भारताने चांगली कामगिरी केली होती. भारताचा संघ अंतिम फेरीत पोहोचला होता. भारतासमोर यावेळी पाकिस्तानचे आव्हान



होते. पण फायनलमध्ये पाकिस्तानने भारतावर मोठा विजय साकारला होता. या सामन्यात आयुष म्हात्रे एक कर्णधार आणि फलंदाज म्हणूनही अपयशी ठरला होता. ही जखम असून पूर्णपणे भरलेली नसताना आता बीसीसीआयने त्याच्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे.

पुढच्या वर्षी १९ वर्षांखालील वर्ल्ड कप झिम्बाब्वे येथे खेळवला जाणार आहे. या वर्ल्ड कपसाठी आता बीसीसीआयने भारताचा संघ जाहीर केला आहे.

हा संघ जाहीर करताना बीसीसीआयने वैभव सूर्यवंशीला तर संघात स्थान दिले आहे, त्याचबरोबर आयुष म्हात्रेकडे सर्वात मोठी जबाबदारी म्हणजेच कर्णधारपद सोपवले आहे. त्यामुळे आता युवा वर्ल्ड कपमध्ये आयुष म्हात्रे हा भारताचे कर्णधारपद भूषवणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

U 19 वर्ल्ड कपसाठी भारताचा संघ : आयुष म्हात्रे (कर्णधार), विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वैभव सूर्यवंशी, आरोन जॉर्ज, वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश सिंग (यष्टीरक्षक), आर.एस. अंबरीश, कनिष्क चौहान, खिलान ए. पटेल, मोहम्मद एनां, हेनिल पटेल, डी. दीपेश, किशन कुमार सिंग, उद्धव मोहन.

आगामी युवा वर्ल्ड कपसाठी आता बीसीसीआयने भारताचा संघ जाहीर केला आहे. या संघात नेमकी कोणाला जागा मिळाली आहे, हे आता स्पष्ट झाले आहे.

## IPL ऑक्शनमध्ये ज्याला कोणीच नाही लावली बोली

मुंबई : भारतीय क्रिकेट संघाचा अनुभवी फलंदाज रोहित शर्माने हे संपूर्ण वर्ष आपल्या दमदार कामगिरीने गाजवले. चाहत्यांना अनेक अविस्मरणीय क्षण देणाऱ्या रोहितने वर्षअखेर उत्तम फॉर्म कायम ठेवला असून आता तो नवीन वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी रवाना झाल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

रोहित शर्माने भारताला चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद मिळवून दिले होते. मात्र, त्यानंतरही संघाच्या नेतृत्वात बदल करत मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी रोहितकडून वनडे संघाचे कर्णधारपद काढून शुभमन गिलकडे सोपवले. यामुळे रोहितच्या भवितव्याबाबत चर्चा रंगल्या होत्या. रोहित सध्या फक्त वनडे क्रिकेटमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत असून, कर्णधारपदही हातातून गेल्याने त्याच्यावर संघाबाहेर जाण्याची टांगती तलवार असल्याचे बोलले जात होते. मात्र, रोहित शर्माने आपल्या कामगिरीतून सर्व टीकाकारांना चोख उत्तर दिले. ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर त्याने आपल्या दर्जाची झलक दाखवली, तर दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेतही त्याने दमदार फॉर्म कायम ठेवला. काही दिवसांपूर्वीच विजय हजारे ट्रॉफीत रोहितने शतक झळकावत आपण अजूनही सर्वोत्तम फलंदाजांपैकी एक असल्याचे सिद्ध केले. वर्षभर व्यस्त क्रिकेट खेळल्यानंतर आता रोहित शर्मा नवीन वर्षाच्या पार्टीसाठी कुटुंबासह रवाना झाला आहे. यावेळी तो मुंबई विमानतळावर स्पॉट झाला. रोहितने काळ्या रंगाचा टी-शर्ट, मिलिटरी रंगाची कॅप आणि काळा गॉगल असा कॅज्युअल लूक केला होता.

तो आपल्या कुटुंबीयांसोबत जात असताना दिसून आला. दरम्यान, विमानतळावर रोहित शर्माची एक झलक पाहण्यासाठी त्याचे चाहतेही मोठ्या संख्येने उपस्थित होते. रोहितचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात शेअर केला जात असून चाहत्यांकडून विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.



## वर्ल्ड कपसाठी भारताचा संघ झाला जाहीर, वैभव सूर्यवंशीसह कोणाला मिळाली संधी ?



आयसीसी u 19 विश्वचषकाच्या आगामी स्पर्धेत १६ संघ चार गटांमध्ये विभागले जातील, त्यानंतर सुपर सिक्स टप्पा, उपांत्य फेरी आणि त्यानंतर अंतिम सामना हरारे येथे खेळवला जाईल. पाच वेळा विजेतेपद पटकावलेला भारत (२०००, २००८, २०१२, २०१८ आणि २०२२) न्यूझीलंड, अमेरिका आणि बांगलादेशसोबत गट बी मध्ये आहे. भारत आपल्या मोहिमेची सुरुवात १५ जानेवारी रोजी बुलावायो येथील क्वीन्स स्पोर्ट्स क्लबमध्ये अमेरिकेविरुद्ध करेल, त्यानंतर १७ जानेवारी रोजी त्याच मैदानावर बांगलादेशविरुद्ध आणि २४ जानेवारी रोजी न्यूझीलंडविरुद्ध सामने खेळेल. भारतीय संघाचे कर्णधारपद यावेळी आयुष म्हात्रेकडे देण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी १९ वर्षांखालील आशिया चषक खेळवला गेला होता, या स्पर्धेत आयुष म्हात्रेच भारताचा कर्णधार होता. भारताने आयुषच्या नेतृत्वाखाली चांगली कामगिरी केली होती. भारतीय संघ अंतिम फेरीतही पोहोचला होता. अंतिम फेरीत भारताला पाकिस्तानकडून पराभव पत्करावा लागला होता.

भारताचा विश्वचषक २०२६ साठी भारतीय U 19 संघ: आयुष म्हात्रे (कर्णधार), विहान मल्होत्रा (उपकर्णधार), वैभव सूर्यवंशी, आरोन जॉर्ज, वेदांत त्रिवेदी, अभिज्ञान कुंडू (यष्टीरक्षक), हरवंश सिंग (यष्टीरक्षक), आर.एस. अंबरीश, कनिष्क चौहान, खिलान ए. पटेल, मोहम्मद एनां, हेनिल पटेल, डी. दीपेश, किशन कुमार सिंग, उद्धव मोहन.

भारताच्या संघात आयुष कर्णधारअसेल, तर उप कर्णधारपद आता विहान मल्होत्राकडे देण्यात आले आहे. हरवंश सिंग हा भारताचा यष्टीरक्षक असेल.

## जयपूरमध्ये मैदानात भीषण क्षण; रोहित शर्माचा सहकारी अंगक्रीश रघुवंशी कोसळला; सीटी स्कॅननंतर दिलासा, प्रकृतीत सुधारणा

जयपूर : सामना खेळण्यासाठी मैदानात उतरलेल्या रोहित शर्माने सुरुवातीलाच कॅच पकडत संघाला पहिली विकेट मिळवून दिली. मात्र, त्यानंतर मैदानात एक भीषण प्रसंग घडला. रोहित शर्माचा संघ सहकारी आणि मुंबईचा युवा क्रिकेटपटू अंगक्रीश रघुवंशी क्षेत्ररक्षणादरम्यान अचानक मैदानात कोसळला. या घटनेनंतर मैदानात तात्काळ स्ट्रेचर आणण्यात आले आणि त्याला रुग्णवाहिकेतून थेट रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे मैदानावरील खेळाडूंसह चाहत्यांच्या काळजाचा ठोका चुकला होता.

नेमकं मैदानात घडलं काय?

सामन्यात मुंबईचा संघ क्षेत्ररक्षण करत होता. यावेळी रोहित शर्मा स्लीपमध्ये उभा होता. उत्तराखंडच्या फलंदाजाने एक मोठा फटका मारला. हा झेल पकडण्यासाठी अंगक्रीश रघुवंशी वेगाने धावला. झेल पकडण्याच्या नादात त्याने स्वतःकडे दुर्लक्ष केले आणि अंदाज चुकल्याने तो जोरात मैदानावर कोसळला. तो इतक्या तीव्रतेने पडला की पुन्हा उभा राहणेही त्याला शक्य झाले नाही.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेत मैदानात तात्काळ स्ट्रेचर मागवण्यात आले. अंगक्रीशवर प्राथमिक उपचार करण्यात आले आणि त्यानंतर त्याला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले.

रुग्णालयात काय झाले?

अंगक्रीश रघुवंशीला शुक्रवारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे त्याचा सीटी स्कॅन काढण्यात आला आणि सखोल वैद्यकीय तपासणी करण्यात आली. सुदैवाने तो उपचारांना चांगला प्रतिसाद देत असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले. उपचारांनंतर त्याच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली आहे.

डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार, सध्या अंगक्रीशला मुंबई संघासोबत राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. मात्र, काही दिवस त्याच्यावर वैद्यकीय निगराणी ठेवण्यात येणार आहे. पूर्णपणे बरा झाल्यानंतर त्याची फिटनेस टेस्ट घेण्यात येईल आणि त्यानंतरच त्याला पुन्हा मैदानात उतरण्याची परवानगी मिळणार आहे.

या घटनेनंतर संघ व्यवस्थापनाने आणि चाहत्यांनी सुटकेचा निश्वास सोडला असून अंगक्रीश लवकरात लवकर मैदानात परतावा, अशीच सर्वांची अपेक्षा आहे.



# सामना जिंकल्याबद्दल कोहलीला मिळाले दहा हजार रोख बक्षीस; करोडो कमावणारे विराट-रोहित विजय हजारे स्पर्धा का खेळत आहेत?

विजय हजारे ट्रॉफीमध्ये गुजरातविरुद्ध दिल्लीकडून ७७ धावा काढल्याबद्दल विराट कोहलीला सामनावीर म्हणून गौरवण्यात आले. बक्षीस म्हणून १०,००० रुपयांचा डमी चेक घेऊन कोहली हसत असल्याचा एक फोटो व्हायरल झाला आहे. लोक विचारत आहेत, "कोहली इतक्या मोठ्या रकमेचे काय करेल?"

विजय हजारे ट्रॉफीमध्ये विराट आणि रोहितला फक्त ६०,००० रुपये सामना फी मिळाली, तर बीसीसीआय एका एकदिवसीय आंतरराष्ट्रीय सामन्यासाठी ६,००,००० रुपये देते.

भारताच्या स्टार क्रिकेटपटूंना विजय हजारेसारख्या देशांतर्गत स्पर्धा का खेळाव्या लागल्या? ते बीसीसीआयच्या दबावामुळे होते की विराट आणि रोहितच्या स्वतःच्या मजबुरीमुळे? जाणून घ्या आजच्या एक्सप्लेनरमध्ये...

प्रश्न १: कोहलीला १०,००० रुपयांचे बक्षीस मिळाल्याबद्दल चाहते काय म्हणत आहेत?

उत्तर: २६ डिसेंबर रोजी विजय हजारे ट्रॉफीमध्ये दिल्ली विरुद्ध गुजरात सामना होता. दिल्लीकडून खेळताना विराट कोहलीने ६१ चेंडूत ७७ धावा केल्या. दिल्ली जिंकली आणि १३ चौकार मारणारा विराट सामनावीर ठरला. सामन्यानंतरच्या समारंभात त्याला १०,००० रुपयांचे बक्षीस मिळाले, ज्याचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

संकेत मंडल नावाच्या वापरकर्त्याने कौन बनेगा करोडपतीमधील अमिताभ बच्चन यांचे प्रसिद्ध वाक्य उद्धृत केले, "एवढ्या पैशांचे तुम्ही काय कराल?"

सतीश कुमार नावाच्या वापरकर्त्याने लिहिले, "विजय हजारे ट्रॉफीमध्ये विराटने जिंकलेल्या १०,००० रुपयात त्याला अडीच लिटर पाणी विकत घेता येईल."

क्रिप्टोकरन्सी आणि फायनान्स स्टार्टअप चालवणाऱ्या पुष्पेंद्र सिंग नावाच्या वापरकर्त्याने लिहिले, "विराट दरवर्षी अंदाजे १८० कोटी रुपये कमावतो. ते दररोज अंदाजे ५० लाख रुपये आहे. तरीही, कोहलीचे स्मितहास्य पाहा, कारण इतिहास पैशांपेक्षा सन्मान आणि संस्मरणीय क्षण लक्षात ठेवतो."

मयंक सोलंकी नावाच्या एका वापरकर्त्याने बीसीसीआयला सांगितले की, "विराटच्या ७७ धावांमुळे दिल्लीला विजय मिळाला, पण बक्षीस इतके कमी का आहे? सामना प्रसारितही झाला नाही. हे स्टार्स अधिक पात्र आहेत."

विजय हजारे ट्रॉफीबद्दल...

२००२ पासून दरवर्षी खेळली जाणारी एक घरगुती लिस्ट-ए क्रिकेट स्पर्धा.

भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार विजय सॅम्युअल हजारे यांच्या नावावरून हे नाव देण्यात आले आहे.

या स्पर्धेत एकूण ३८ संघ सहभागी होतात. हे संघ दोन श्रेणींमध्ये विभागले गेले आहेत: एलिट आणि प्लेट.

एलिट श्रेणीमध्ये चार गट आहेत: अ, ब, क आणि ड, प्रत्येक गटात आठ संघ आहेत.

प्लेट श्रेणीमध्ये अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय आणि नागालँड सारखे नवीन आणि कमकुवत संघ समाविष्ट आहेत.

प्रत्येक गटातील एक संघ इतर संघांविरुद्ध स्पर्धा करतो, ज्यामुळे प्रत्येक हंगामात अंदाजे १५० सामने होतात.

यावेळी, विराटचा दिल्ली संघ गट डी मध्ये आहे. रोहित शर्माचा मुंबई संघ गट सी मध्ये आहे.

या संघांमधील गट सामने सध्या सुरू आहेत. संपूर्ण स्पर्धा १८ जानेवारीपर्यंत सुरू राहील.

प्रश्न २: रोहित आणि विराटसारखे श्रीमंत आणि सेलिब्रिटी खेळाडू विजय हजारे ट्रॉफी का खेळत आहेत?

उत्तर: यामागे तीन प्रमुख कारणे आहेत...१. बीसीसीआयने किमान दोन सामने खेळण्याचे निर्देश दिले आहेत

१५ डिसेंबर रोजी, बीसीसीआयने सर्व सध्याच्या राष्ट्रीय संघातील खेळाडूंना विजय हजारे ट्रॉफीमध्ये




किमान दोन एकदिवसीय सामने खेळणे अनिवार्य केले. बीसीसीआयच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने पीटीआयला सांगितले की, "११ डिसेंबर रोजी दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दुसऱ्या टी२० सामन्यानंतर, खेळाडूंना स्पष्टपणे सांगण्यात आले होते की विजय हजारे ट्रॉफी खेळणे अनिवार्य आहे."

अधिकाऱ्याने पुढे स्पष्ट केले की, "विजय हजारे ट्रॉफीच्या सहा फेऱ्या २४ डिसेंबरपासून ११ जानेवारी रोजी न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेच्या सुरुवातीपर्यंत नियोजित होते. हे सर्व १८ जानेवारीपर्यंत पूर्ण करायचे आहेत. खेळाडूंना त्यांच्या राज्य संघासोबत सहापैकी कोणत्या दोन फेऱ्या खेळायच्या आहेत हे ठरवायचे आहे."खरंच, भारताचा शेवटचा टी२० सामना १९ डिसेंबर रोजी दक्षिण आफ्रिकेविरुद्ध होता. भारताचा पुढील आंतरराष्ट्रीय एकदिवसीय सामना सुमारे तीन आठवड्यांनंतर आहे. अशा परिस्थितीत, खेळाडूंनी त्यांची लय कायम ठेवण्यासाठी या दरम्यान देशांतर्गत क्रिकेट खेळावे अशी बोर्डाची इच्छा आहे.

नोव्हेंबर २०२५ ते जानेवारी २०२५ या कालावधीत ऑस्ट्रेलियातील कसोटी मालिकेत भारताच्या खराब कामगिरीनंतर अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने खेळाडूंना हे निर्देश दिले. समितीच्या बैठकीत भारतीय संघाच्या कसोटी मालिकेत पराभवानंतर सर्व फॉरमॅटमध्ये देशांतर्गत क्रिकेटला अधिक महत्त्व देण्याची शिफारस करण्यात आली.

तथापि, बीसीसीआयच्या एका अधिकाऱ्याच्या मते, रोहित आणि विराट स्वेच्छेने विजय हजारे ट्रॉफी खेळत होते आणि त्यांच्यावर कोणताही दबाव नव्हता. बीसीसीआयने जसप्रीत बुमराह आणि श्रेयस अय्यर यांनाही स्पर्धेतून बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य दिले.

बीसीसीआयच्या आग्रहास्तव, रोहित आणि विराट यांनी २०२५ च्या सुरुवातीला स्थानिक रणजी करंडक सामन्यांमध्ये पुनरागमन केले. तथापि, ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर, रोहितने ७ मे रोजी निवृत्तीची घोषणा केली

## महत्त्वाचे...

### रब्बीसाठी मागणी कमी, 'मुळा'तून उन्हाळ्यात 2 आवर्तनाचा दिलासा



अहिल्यानगर -जिल्हाभरातील रब्बी पिकांच्या सिंचनासाठी मागील वर्षी १८ डिसेंबरला मुळा धरणातून आवर्तन सोडले होते. यंदा ३.४६ लाख हेक्टर क्षेत्रावर रब्बीची पेरणी झाली. दमदार पावसामुळे अजुनही अनेक भागात ओढे नाले वाहते आहेत. त्यामुळे मुळा धरणाच्या लाभक्षेत्रातून आवर्तनाची अद्याप मागणी आलेली नाही. त्यामुळे रब्बीचे आवर्तन महिनाभर उशिराने सोडले जाऊ शकते. मागणी कमी राहिल्यास, आवर्तन कमी कालावधीचे होईल. परिणामी उन्हाळ्यात दोन आवर्तने होऊ शकतील.अहिल्यानगर शहरासह पाच तालुक्यांसाठी वरदान ठरलेल्या मुळा धरणातून, सिंचन व पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जातो. धरणाची पाणीसाठवण क्षमता २६००० दशलक्ष घनफूट आहे. वर्षभरात सिंचनासाठी शेतकऱ्यांना रब्बी, खरीप व उन्हाळी हंगामात आवर्तन दिले जाते. राहुरी, घोडेगाव, नेवासे, चिलेखनवाडी, अमरापूर या पाच उपविभाग आहेत. या उपविभागांकडे पाणीवापर संस्थांकडून आवर्तनासाठी मागणी नोंदवली जाते. तथापि, मागणी आली नसल्याचा दावा मुळा विभागाकडून केला जात आहे. मागणी आल्यानंतर पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या अध्यक्षतेखालील कालवासल्लागार समितीची रब्बीसाठी बैठक होणार आहे. यात सिंचनासाठीचे नियोजन आखले जाणार आहे. एका आवर्तनातून सुमारे ४५०० दलघफू पाणी सोडले जाते. परंतू, सद्यस्थितीतील कमी मागणी पाहता, रब्बीचे आवर्तन ३ हजार दलघफू होऊ शकेल असा अंदाज वर्तवला जात आहे. उत्तमराव निर्मळ, निवृत्त कार्यकारी अभियंता, जलसंपदा. धरणात आवश्यक पाणी असल्यास उन्हाळ्यात दोन आवर्तन दिले जातात. परंतू, यंदाची स्थिती मागील काही वर्षातील सर्वाधिक चांगली स्थिती आहे. जानेवारीतील रब्बीचे आवर्तन फेब्रुवारीच्या मध्यापर्यंत सुरू राहील. उन्हाळी मार्च ते एप्रिल मध्यापर्यंत, पुन्हा १ मे ते ३१ अन् शेवटचे १५ जून ते १५ जुलैपर्यंत सिंचनास अडचण नाही स्थानिकपातळीवर स्थापन झालेल्या सुमारे २८० पाणीवापर संस्थांमार्फत उपविभागस्तरावर मागणी नोंदवली जाते. प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार आतापर्यंत नेवासे तालुक्यात दोन संस्थांनी मागणी नोंदवली आहे.

### शहरातून दर अर्ध्या तासाला लांब पल्ल्याच्या बसेस



अहिल्यानगर- नाताळनिमित्त शाळांना सुट्या असल्याने ग्रामीण भागातील शालेय फेऱ्या बंद आहेत. या गाड्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर इतर मार्गांवर वळवण्यात आल्या आहेत. शहरातील तारकपूर, स्वस्तिक चौक तसेच माळीवाडा स्थानकात सध्या प्रवाशांची मोठी गर्दी पहायला मिळत आहे. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या अहिल्यानगर विभागाने जादा गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला. उत्सव कालावधीत बाहेरगावी शिक्षण तसेच व्यवसायानिमित्त वास्तव्यास असलेले नागरिक सणानिमित्त गावी आले आहेत. सणानिमित्त शाळांनाही सुट्या असल्याने, पर्यटनाला जाणाऱ्या प्रवाशांची संख्याही वाढली आहे. महामंडळाने नाशिक, पुणे, छत्रपती संभाजीनगर मार्गावर अर्ध्या तासाला बस पाठवण्याचे नियोजन केले आहे. कल्याण मार्गावर दर तासाला गाडी धावत आहेत. तर मुंबईसाठी रातराणी गाड्यांना प्रवाशांची गर्दी होत आहे. अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर तसेच पुणे विभागामार्फत सुटणाऱ्या इलेक्ट्रिक गाड्यांना प्रतिसाद मिळत आहे. नाताळ सणानिमित्त बसस्थानकांवर गर्दी दिसत असली, तरी प्रवाशांच्या मागणीनुसार त्या मार्गांवर गाड्या पाठवल्या जात आहेत. सद्यस्थितीत दर अर्ध्यातासाला नाशिक, पुणे, तसेच छत्रपती संभाजीनगरला गाडी पाठवली जाते. सुटीच्या पार्श्वभूमीवर धार्मिक स्थळी जाण्यासाठी विशेष दर्शन यात्रांचेही आयोजन केले आहे, अशी माहिती एसटी प्रशासनाने दिली.

# काँग्रेसच्या माजी मंत्र्यांच्या मुलाला दिला पक्षात प्रवेश, प्रशांत जगतापांविरोधात रिंगणात उतरवणार

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत भारतीय जनता पक्षाने विरोधकांना जोरदार धक्के देण्यास सुरुवात केली आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी राज्यमंत्री बाळासाहेब शिवरकर यांचे चिरंजीव अभिजित शिवरकर आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अत्यंत विश्वासू सहकारी, माजी उपमहापौर दिलीप बराटे यांनी आज अधिकृतपणे भाजपमध्ये प्रवेश केला.

या 'हाय-व्होल्टेज' पक्षप्रवेशामुळे पुण्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला (अजित पवार गट) त्यांच्या बालेकिल्ल्यांमध्येच मोठे भगदाड पडले आहे.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, भाजप शहराध्यक्ष धीरज घाटे आणि निवडणूक प्रमुख गणेश बिडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.

पुण्यात गेल्या काही दिवसांपासून भाजपमध्ये सुरू असलेली 'इनकमिंग'ची लाट आजच्या या दोन बड्या नेत्यांच्या प्रवेशाने अधिकच गडद झाली आहे. 15 जानेवारीला मतदान प्रक्रिया पार पडणार असल्याने, प्रत्यक्ष उमेदवारी अर्ज भरण्याच्या काळातच विरोधकांचे महत्त्वाचे बुरुज ढासळल्याने महाविकास आघाडीसमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.

अभिजित शिवरकर यांचा वानवडी परिसरात मोठा प्रभाव असून, 2007 मध्ये ते सर्वात तरुण नगरसेवक म्हणून निवडून आले होते. "14 वर्षांचा वनवास संपवून आज मी भाजपमध्ये प्रवेश करत आहे," अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. आगामी निवडणुकीत वानवडी भागातून काँग्रेसचे प्रशांत जगताप यांच्या विरोधात भाजपकडून शिवरकर यांना मैदानात उतरवले जाण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

शिवरकर यांनी पुणे शहराच्या शाश्वत विकासासाठी भाजपची वाट धरल्याचे स्पष्ट करत, नवीन पक्षातही निष्ठेने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे वानवडीतील काँग्रेसची हक्काची मते भाजपच्या पारड्यात जाण्याची शक्यता आहे.

दुसरीकडे, वारजे परिसरातील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा मोठा कणा मानले जाणारे दिलीप बराटे यांच्या पक्षप्रवेशामुळे सत्ताधारी महायुतीतील मित्रपक्षालाच मोठा फटका बसला आहे. दिलीप बराटे यांची स्थानिक पातळीवर मजबूत संघटनात्मक ताकद असून ते अनेक वर्षांपासून ज्येष्ठ नगरसेवक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे पश्चिम पुण्यातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलणार असून, भाजपची ताकद वारजे आणि कोथरुड परिसरात दुपटीने वाढली आहे.



महापालिका निवडणुकीने पुण्याचे वातावरण आता पूर्णपणे तापले आहे.

एका बाजूला भाजपमध्ये मोठ्या नेत्यांची रांग लागली असताना, दुसरीकडे जागावाटपावरून महाविकास आघाडी आणि महायुतीमधील कुरबुरी अजूनही सुरूच आहेत. 15 जानेवारीच्या मतदानात पुण्यातील सुज्ञ नागरिक या पक्षांतरांना कसे स्वीकारतात आणि विकासाच्या मुद्द्यावर कोणाला कौल देतात? हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरेल.

## सोलापूर मनपासाठी एमव्हीएचा फॉर्म्युला निश्चित काँग्रेस ४५, ठाकरे गट ३०, पवार गट २०, माकपला ७ जागा

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई- महाविकास आघाडीच्या नेत्यांनी सोलापूर महापालिकेसाठी जागावाटपाची घोषणा केली आहे. त्यात काँग्रेस सर्वाधिक 45 जागांवर लढणार असून, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष 30 जागांवर लढणार आहेत. यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्ष व माकपलाही सन्मानकारक जागा देण्यात आल्या आहेत. काँग्रेसने आपल्या 20 उमेदवारांच्या नावाची घोषणाही केली आहे.

102 सदस्यीय सोलापूर महापालिकेत सत्ताधारी महायुती विरुद्ध विरोधी बाकावरील महाविकास आघाडी असा सामना रंगणार आहे. महाविकास आघाडीने जागावाटपाचा मुद्दा निकाली काढून महायुतीवर आघाडी घेतली आहे. मविआच्या जागावाटपानुसार, काँग्रेस 45, ठाकरे गट 30, शरद पवार गट 20 व माकप 7 जागांवर निवडणूक लढणार आहेत. महाविकास आघाडी 4 जानेवारी रोजी आमच्या प्रचाराचा नारळ फोडेल. खासदार प्रणिती शिंदे, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, नरसय्या आडम मास्तर, खासदार ओमराजे निंबाळकर, माजी खासदार चंद्रकांत खैरे आदी नेते प्रचाराच्या शुभारंभाला उपस्थित राहतील, असे ठाकरे गटाचे शहरप्रमुख अजय दासरी यांनी सांगितले.



महाविकास आघाडीत काँग्रेसच्या वाट्याला सर्वाधिक जागा आल्यामुळे ठाकरे गटाचे कार्यकर्ते आक्रमक झालेत. ठाकरे गटाचे उत्तर विधानसभा प्रमुख महेश धाराशिवकर यांनी या प्रकरणी अजय दासरी यांना जाब विचारला. यावेळी त्यांच्यात काहीशी बाचाबाचीही झाली. ही बाचाबाची एकमेकांना पाहून घेण्यापर्यंत गेली. यामुळे पत्रकार परिषदेच्या ठिकाणी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यामुळे ठाकरे गटाला निवडणुकीच्या तोंडावर बंडखोरीचे ग्रहण लागण्याची शक्यता आहे.

महाविकास आघाडीने सोलापुरात प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वातील वंचित बहुजन आघाडीलाही सोबत घेण्याचा प्रयत्न केला. त्यांनी वंचितसह आम आदमी पक्षालाही सोबत येण्याचे आवाहन केले. पण त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

## मंगेश काळोखे हत्या प्रकरण:भररस्त्यात कुऱ्हाड-तलवार-कोयत्याने २४ वार करून संपवले...

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई-रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे शिवसेना शिंदे गटाचे निष्ठावान कार्यकर्ते मंगेश काळोखे यांची ज्या निर्घृणपणे हत्या करण्यात आली, त्या घटनेचा अंगावर शहारे आणणारा सीसीटीव्ही व्हिडीओ आता समोर आला आहे. भररस्त्यात पाठलाग करून, धारधार शस्त्रांनी तब्बल २४ ते २७ वार करत मंगेश काळोखे यांना संपवण्यात आले. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली असून, राजकीय सुडापोटी करण्यात आलेल्या या कृत्याचा सीसीटीव्ही पुरावा आता पोलिसांच्या हाती लागला आहे.

मंगेश काळोखे हे नेहमीप्रमाणे आपल्या मुलाला शाळेत सोडण्यासाठी घराबाहेर पडले होते. मुलाला सुरक्षितपणे शाळेत सोडून ते घरी परतत असतानाच दबा धरून बसलेल्या काही अज्ञात व्यक्तींनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात मंगेश काळोखे यांचा मृत्यू झाला. आता या घटनेचा सीसीटीव्हीचे फूटेज समोर आले आहे.

या व्हिडीओमध्ये हल्लेखोर मंगेश काळोखे यांचा जीवघेणा पाठलाग करताना दिसत आहेत. पळत असताना काळोखे रस्त्यावर खाली पडले, तेव्हा तिघांनी त्यांना घेरले आणि काहीही विचार न करता तलवार व कोयत्याने सपासप वार करण्यास सुरुवात केली. प्रामुख्याने काळोखे यांच्या डोक्यावर आणि चेहऱ्यावर सपासप वार करण्यात आले. जवळपास 27 वार केल्यानंतर मंगेश काळोखे रक्ताच्या थारोळ्यात जागेवरच कोसळले. त्यांचा मृत्यू झाल्याची खात्री पटल्यानंतर हल्लेखोर तिथून पसार झाले. काळोखे हे नवनिर्वाचित नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती होते. राजकीय वैमनस्यातून हत्येचा कट

पोलीस तपासात आणि फिर्यादीनुसार, या हत्येमागे नुकत्याच झालेल्या खोपोली नगरपरिषद निवडणुकीतील पराभवाचे शल्य आणि जुना राजकीय वाद कारणीभूत असल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, प्रवक्ते भरत भगत आणि रवींद्र देवकर यांच्यासह एकूण 10 जणांवर हत्येचा कट रचल्याचा आणि खुनाचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपींनी कुऱ्हाड, तलवार आणि कोयत्याचा वापर करून हे कृत्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.



या प्रकरणात सुधाकर घारे, भरत भगत, रवींद्र देवकर, धनेश देवकर, दर्शन देवकर आणि सचिन चव्हाण यांच्यासह एका बाऊन्सरचा आणि तीन अनोळखी लोकांचा समावेश आहे. राजकीय वर्चस्व टिकवण्यासाठी आणि निवडणुकीतील पराभवाचा बदला घेण्यासाठी हा कट रचल्याचा आरोप काळोखे यांच्या कुटुंबीयांनी केला आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खोपोलीत जाऊन काळोखे कुटुंबीयांची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले. यावेळी बोलताना त्यांनी अत्यंत कडक भूमिका मांडली. "मंगेश काळोखे यांची हत्या केवळ सुडापोटी करण्यात आली आहे. अशा हिंसक प्रवृत्तीच्या लोकांना समाजात जागा नाही. हा खटला आम्ही फास्टट्रॅक कोर्टात चालवणार असून आरोपींना फासावर लटकवण्यासाठी सरकार पूर्ण ताकद लावेल," असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच, या हत्येमागे कितीही मोठा 'आका' असला तरी तो सुटणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

## मंगेश काळोखे हत्या प्रकरण:एकनाथ शिंदेंनी घेतली कुटुंबीयांची भेट, सुनील तटकरे रायगडचा आका म्हणत महेंद्र थोरवेंचे गंभीर आरोप

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

रायगड- जिल्ह्यातील शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील राजकीय संघर्ष आता टोकाचा आणि हिंसक वळणावर पोहोचला आहे खोपोली येथील शिवसेनेच्या महिला नगरसेविका मानसी काळोखे यांचे पती मंगेश काळोखे यांची भरचौकात निर्घृण हत्या झाल्याने संपूर्ण जिल्हा हादरला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे सरचिटणीस सुनील तटकरे यांच्या घरी काळोखेंच्या हत्येचा प्लॅन ठरला, असा खळबळजनक आरोप शिवसेना शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी केला. दरम्यान, या घटनेची गांभीर्याने दखल घेत शिवसेना मुख्य नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पीडित कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले.

आमदार महेंद्र थोरवे यांनी काळोखे हत्याकांडप्रकरणी सुनील तटकरेंवर खळबळजनक आणि गंभीर आरोप केलेत. आरोपी रवींद्र देवकर याने हत्येच्या चार-पाच दिवसांपूर्वी सुतारवाडी येथे जाऊन सुनील तटकरे यांची भेट घेतली होती, असा दावा महेंद्र थोरवे यांनी केला आहे. "रायगडमध्ये सुनील तटकरे यांनी रक्तरंजित राजकारण सुरू केले असून विरोधकांच्या हत्या त्यांच्या सांगण्यावरून केल्या जात आहेत. तटकरे हेच रायगडचा 'आका' बनले आहेत," असा खळबळजनक आरोप महेंद्र थोरवे यांनी केला.

या हत्येत राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांचाही सहभाग असून, सुधाकर घारे आणि रवींद्र देवकर यांनी 'प्री-प्लॅन' करूनच मंगेश काळोखे यांना संपवल्याचा आरोप महेंद्र थोरवे यांनी केला आहे. जोपर्यंत सुधाकर घारेसह 10 आरोपींना अटक होत नाहीत, तोपर्यंत आम्ही हटणार नाही. याप्रकरणी पोलिस



स्टेशनवर ठिय्या आंदोलन करू, असा इशाराही थोरवे दिला आहे.

दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज काळोखे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. उपमुख्यमंत्र्यांना पाहताच कुटुंबीयांचे अश्रू अनावर झाले. "आरोपींवर मकोका लावा आणि त्यांना फाशीची शिक्षा होईल असे पहा," अशी आर्त साद काळोखे कुटुंबाने घातली. यावर शिंदे यांनी अत्यंत कठोर भूमिका मांडली. "काळोखे कुटुंब हे शिवसेनेचे कुटुंब आहे. आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. या हत्याकांडातील एकाही आरोपीला सोडले जाणार नाही, त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल," असा शब्द एकनाथ शिंदे यांनी पीडित कुटुंबाला दिला.

रायगडमध्ये नुकत्याच नगरपालिका निवडणुका पार पडल्या असून, निकाल लागल्यानंतर काहीच दिवसांत हे हत्याकांड घडल्याने याला राजकीय किनार असल्याचे स्पष्ट होत आहे. मंगेश काळोखे यांची हत्या भरचौकात करण्यात आली, ज्यामुळे खोपोली शहरात घबराटीचे वातावरण पसरले आहे. शिवसेनेने या हत्येसाठी थेट राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांना जबाबदार धरल्यामुळे रायगड जिल्ह्यात महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या दोन मित्रपक्षांमधील दरी आता आणखी रुंदावली आहे.

## संभाजीनगरात एमआयएम उमेदवाराला मारहाण

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

छत्रपती संभाजीनगर- येथील एमआयएमच्या एका उमेदवाराला दुसऱ्या एका इच्छुक उमेदवाराच्या समर्थकांनी मारहाण घडल्याची घटना घडली आहे. शहरातील प्रभाग क्रमांक 12 मधील किराडपुरा भागात ही घटना घडली. त्याचा एक व्हिडिओ आता समोर आला आहे. त्यात इच्छुक उमेदवाराचे समर्थक अधिकृत उमेदवाराला मारहाण करताना दिसून येत आहेत.

यासंबंधीच्या माहितीनुसार, एमआयएमने दोन दिवसांपूर्वीच शहरातील 8 उमेदवारांच्या नावांची घोषणा केली. त्यात प्रभाग क्रमांक 12 मधील पक्षाचे अधिकृत उमेदवार मोहमद असरार यांनी



शुक्रवारी सायंकाळी किराडपुरा भागात रॅली काढली. यावेळी तिकीट न मिळालेल्या माजी नगरसेविका नसीम बी सांडू खान यांचा मुलगा हाजी इसाक यांचे समर्थक असरार यांच्या रॅलीत पोहोचले. त्यांनी त्यांना उमेदवारीविषयी जाब विचारला. यावेळी त्यांच्यात बाचाबाची आणि अखेर हाणामारी झाली. ही घटना घडली तेव्हा घटनास्थळी मोठी गर्दी गोळा झाली होती.

# १९८ किलो कांद्याचे मिळाले केवळ २२ रुपये!:नाना पटोलेंनी फेसबुक पोस्टद्वारे मांडली शेतकऱ्याची व्यथा, सरकारवर डागली टीकेची तोफ

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई-राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या नशिबी असलेली अवहेलना आणि आर्थिक संकटाचे भीषण वास्तव काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी एका फेसबुक पोस्टद्वारे समोर आणले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने 198 किलो कांदा विकल्यानंतर त्याच्या हातात केवळ 22 रुपये पडले असून, ही घटना सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणाचे जिवंत उदाहरण असल्याची टीका नाना पटोले यांनी केली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील लाडजळगाव येथील गोरक्ष दराडे या शेतकऱ्याच्या हिशोबाची पावती नाना पटोले यांनी सोशल मीडियावर शेअर केली आहे. शेतकऱ्याने 198 किलो कांदा विकला. त्याचे त्याला 298 रुपये मिळाले. वाहतूक, मजुरी आणि इतर खर्च वजा जाता शेतकऱ्याच्या हातात केवळ 22 रुपये पडले.

या घटनेचा दाखला देत नाना पटोले यांनी सरकारवर कडाडून हल्ला चढवला. ते म्हणाले, "सरकारकडून शेतकऱ्यांच्या कल्याणाच्या मोठ्या घोषणा केल्या जातात, मात्र त्या केवळ कागदावरच मर्यादित आहेत. १९८ किलो कांदा २९८ रुपयांना विकावा लागणे आणि त्यानंतर शेतकऱ्याच्या पदरात केवळ २२ रुपये पडणे, हे या सरकारचे मोठे अपयश आहे."

गोरक्ष दराडे या शेतकरी बांधवाने चार गोणी कांदे बाजारात विक्रीसाठी नेले. पिकासाठी घेतलेलं कर्ज, घाम गाळून केलेली मेहनत, पाणी-खत-औषधांचा खर्च सगळं बाजूला ठेवलं, तर १९८ किलो कांद्यासाठी फक्त २९८ रुपये त्याला मिळाले आणि इतर खर्च वगळून फक्त त्याच्या हातात निव्वळ २२ रुपये आले. हे तर सरकारच्या अपयशाचं जिवंत उदाहरण आहे.

कांद्याच्या गोणीसाठीच १६० रुपये खर्च झाला. म्हणजे शेतकऱ्याने माल विकून काही कमावलं नाही, उलट तो आणखी तोट्यात गेला. अर्धा एकर कांद्याला सुरवातीपासून २० ते २५ हजार रुपये खर्च येतो आणि तो विकल्यानंतर शेतकऱ्यांना त्या बदल्यात २२ रुपये मिळत असतील, तर ही मोठी शोकांतिका आहे. हे कुठलं शेतकरी हिताचं सरकार आहे? जिथे शेतकऱ्याच्या मालाला कवडीमोल भाव आणि बाजारात दलाल, व्यापारी व यंत्रणा मात्र सुस्थितीत!सरकार मोठमोठ्या घोषणा करते, जाहिरातींमध्ये शेतकऱ्याचा फोटो वापरते, पण प्रत्यक्षात शेतकरी उद्ध्वस्त होतोय याकडे डोळेझाक करते. ना हमीभावाची ठोस अंमलबजावणी, ना उत्पादन खर्चावर आधारित दर, ना बाजार व्यवस्थेवर नियंत्रण, सगळं काही कागदावरच. सरकार जर अजूनही झोपेत राहिलं, तर शेतकरी रस्त्यावर येईल आणि त्याची संपूर्ण जबाबदारी या संवेदनाहीन सत्ताधाऱ्यांची असेल.

निवडणुकीच्या जाहीरनाम्यात जाहीर केलेली कर्जमाफी जूनपर्यंत सरकार जाहीर करणार आहे. तोपर्यंत असे कितीतरी शेतकरी कर्जबाजारी होतील याचे भान ठेवून सरकारने येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये शेतीमालाला गॅरंटेड हमीभाव देणारा कायदा करावा, जेणेकरून १९८ किलोग्राम कांदा २९८ रुपयांत विकला जाणार नाही.

